मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले

। मुख्य संपादक - भारती आमले । उपसंपादक - श्री विलास गायकवाड । कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे । निवासी संपादक - श्री राकेश पाटील । सह संपादक - श्री मुकुंद कांबळे । महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : 3 ■ अंक : ९० ■ मंगळवार, ०९ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# "वंदे मातरम स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आणि ऊर्जा देईल" - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत हे 'वंदे मातरम्' १५० वर्षे पूर्ण होत असताना विशेष चर्चासत्राला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकसभेत वंदे मातरमवर बोलताना म्हणाले, या गीतानं आपल्याला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची प्रेरणा दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे लोकसभेत वंदे मातरमवरवर बोलताना म्हणाले, "वंदे मातरम हा केवळ स्वातंत्र्याचा मंत्र नव्हता. त्याहूनही खूप काही होते. स्वातंत्र्य चळवळ ही मातृभूमीला गुलामगिरीच्या तावडीतून मुक्त करण्यासाठीची लढाई होती. वेदामध्ये म्हटलं आहे, 'ही भूमी माझी माता आहे आणि मी या मातीचा पुत्र आहे.' श्रीराम



लंकेतून बाहेर पडताना म्हणाले होते, माता आणि आई ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे.' वंदे मातरम हे आपल्या महान सांस्कृतिक वारशाचा आधुनिक अवतार आहे."

"येथे कोणताही नेतृत्व किंवा विरोध नाही. वंदे मातरमचे ऋण फेडण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र आलो आहोत. या गीतामुळेच आपण सर्वजण येथे एकत्र आहोत. हे ऋण फेडण्यासाठी आपल्या सर्वांसाठी हा एक पवित्र प्रसंग आहे. वंदे मातरमनं देशाला उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत एकसंध केलं. आता पुन्हा एकत्र येऊन पुढे जाण्याची वेळ आली आहे. हे गीत आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरणा आणि ऊर्जा देईल. आपण २०४७ पर्यंत आपला देश स्वावलंबी आणि विकसित करण्याचा आपला संकल्प पुन्हा सुरू केला पाहिजे.

वंदे मातरमला ५० वर्षे पूर्ण होताना भारत इंग्रजांच्या ताब्यात होता. वंदे मातरमला १०० वर्षे पूर्ण होताना भारत आणीबाणीच्या विळख्यात होता. त्यावेळी देशभक्तांना तुरुंगात टाकण्यात आले होते. वंदे मातरमची १५० वर्षे ही आपल्या भूतकाळातील अभिमानाला वंदन करण्याची संधी आहे. या गीतानं आपल्याला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची प्रेरणा दिली-पंतप्रधान, नरेंद्र मोदी

यापूर्वी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, काँग्रेसच्या निर्णयामुळे भारताच्या फाळणीची बीजे रोवली गेली. राष्ट्रगीताचे तुकडे झाले. त्यावर रवींद्रनाथ टागोरांच्या सल्ल्यावर आधारित निर्णय घेतल्याचं काँग्रेसनं स्पष्टीकरण केलं होतं. राज्यसभेत मंगळवारी 'वंदे मातरम्'वरील चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे सुरुवात करणार आहेत. 'वंदे मातरम्' चर्चेशी संबंधित वेळापत्रकानुसार लोकसभेत एकूण १० तासांचा वेळ देण्यात आला आहे. त्यापैकी सत्ताधारी एनडीएच्या खासदारांना तीन तास देण्यात आले आहेत.'वंदे मातरम्' आणि 'जय हिंद' शब्द न वापरण्याच्या सूचना- तत्पूर्वी, हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच राज्यसभा सचिवालयानं संसदेत शिष्टाचार राखण्यासाठी खासदारांनी 'वंदे मातरम्' आणि 'जय हिंद' सारख्या घोषणा वापरणे टाळावे, असा सूचना दिल्या होत्या. त्यावर भारताचे स्वातंत्र्य आणि एकतेच्या प्रतीकांबद्दल एनडीए अस्वस्थ असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. 'वंदे मातरम्'बद्दल सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतभेद असल्यानं संसदेत गदारोळ होण्याची शक्यता आहे. संसदेचं हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

भाजपाची काँग्रेसवर जोरदार टीका- भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते संबित पात्रा यांनी रविवारी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसच्या नेतृत्वावर जोरदार टीका केली. जवाहरलाल नेहरूंचा 'निर्मित वारसा' जपण्यासाठी काँग्रेसकडून निवडकपणे इतिहास जपत आण्यात आल्याचा पात्रा यांनी आरोप केला. काँग्रेस नेते नियमितपणे भाजापवर नेहरूंचे योगदान पुसून टाकल्याचा आरोप करतात. त्यावर भाजपाचे प्रवक्ते यांनी काँग्रेसकडून अनेक राष्ट्रीय आदर्शांना कमी लेखण्यात आल्याचा आरोप केला. नेहरु केंद्रित गोष्टी ठसवण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही दशकं बाजूला करण्यात आलं होतं, असा आरोप पात्रा यांनी केला.




**हिंदू लोहार सामाजिक विकास मंडळ पनवेल तालुका मंडळाचा २०२६ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा पनवेल तालुका मोरबे येथे मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला मंडळाचे अध्यक्ष श्री संतोष जाधव यांनी स्वता सुत्रसंचालन केले.हिंदू लोहार सामाजिक विकास मंडळ हा बारा वर्ष कार्यरत आहे प्रत्येक वर्षी सामाजिक शैक्षणिक कार्यक्रम राबविले जातात मग त्यात वृध्दश्रमात जावून अन्नदान आदीवासी भागामध्ये जावून शाळेय साहीत्य वाटप गो शाळेमध्ये जावून खाण्याचे साहीत्य देणे तसेच गोर गरीबांच्या त्यांच्या गरजा पाहून सहकार्य करणे असे अनेक कार्यक्रम या मंडळा कडून करण्यात येत असतात मंडळाचे माजी अध्यक्ष श्री वसंत मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला मोरबे येथील माजी सरपंच उपसरपंच ग्रामस्थ तसेच हिंदू लोहार समाज उपस्थीत होते आलेल्या पाहुण्याचे सदस्यांकडून पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आले व कार्यक्रमाची सांगता श्री संतोष जाधव व श्री अजित मोरे यांनी केली**

**( दैनिक युवक आधार )**

## डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित विशेष शाळेतर्फे दिव्यांग जनजागृती भव्य रॅली

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल** : जागतिक दिव्यांग सप्ताहानिमित्त डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातील सर्वात प्रभावी उपक्रम म्हणून ८ डिसेंबर रोजी 'दिव्यांग जनजागृती रॅली' उत्साहात काढण्यात आली.

शाळेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नंदकुमार जाधव व खजिनदार श्री. अतुल वाणी यांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव यांनाही विद्यार्थ्यांनी आदरपूर्वक पुष्पगुच्छ अर्पण केले. त्यानंतर डॉ. नंदकुमार जाधव यांनी श्रीफळ वाढवून रॅलीचे उद्घाटन केले.ढोल-ताशांच्या निनादात, घोषणांनी परिसर दुमदुमत रॅली शाळेच्या आवारातून मार्गस्थ झाली. एचडीएफसी सर्कल – शिवा कॉम्प्लेक्स – एस.



बँक – अंबा माता मंदिर – शाळा या मार्गावरून रॅलीने जनजागृतीचा ठसा उमटवला.

रॅलीमध्ये विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच पिल्ले कॉलेजचे प्रशिक्षणार्थी उत्साहाने सहभागी झाले."विशेष शिक्षणाचा गौरव", "दिव्यांगांना समान संधी", "शीघ्र निदान – योग्य उपचार" अशा प्रभावी घोषणा देत सर्वांनी समाजमनाला जागृत केले.

परिसरातील नागरिक, दुकानदार, पादचारी यांना दिव्यांग हक्क, सुविधा आणि उपचाराबाबतची माहिती देणारी पत्रके वाटण्यात आली. अंबा माता मैदान येथे रॅलीचा थोडा विराम घेऊन मुलांना पाणी, फ्रुटी आणि अल्पोपहार देण्यात आला.रॅली शाळेत परतल्यानंतर विद्यार्थ्यांना डॉ. रमेश पटेल यांच्यातर्फे बिस्किट, संत्री व पाण्याचे वाटप करून दिवसाचा सांगता कार्यक्रम आनंदात पार पडला.दिव्यांग सप्ताहानिमित्त काढण्यात आलेली ही रॅली सामाजिक जागृतीचे सामर्थ्य दाखवणारी ठरली.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यात चर्चा



**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** नागपूरमध्ये सुरू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नागपूरमधील देवगिरी या निवासस्थानी आगमन झाले. यावेळी राज्याचे नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी नुकत्याच त्यांनी स्वीकारलेल्या नवीन जबाबदारीबद्दल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्याशी संबंधित महत्त्वाच्या विषयावर त्यांनी एकमेकांशी चर्चा केली.

## बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशनचा सीएसआर उपक्रम

### अपोलो नवी मुंबईमध्ये तीन आपत्कालीन वैद्यकीय रुग्णवाहिका जोडल्या

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई वार्ताहर :** अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने आज बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशनच्या तीन प्रगत जीवन-समर्थन रुग्णवाहिकांच्या अधिकृत लाँचिंगनिमित्त पत्रकार कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश प्रदेशातील आपत्कालीन वैद्यकीय सेवांची क्षमता वाढवणे आणि गंभीर अवस्थेत असलेल्या रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे असा आहे. या रुग्णवाहिकांचा वापर यापूर्वीच नवी मुंबईतील विशेष वैद्यकीय शिबिरांमध्ये करण्यात आला असून त्यांनी आतापर्यंत २३ हजारांहून अधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचवली आहे.

श्री.अरूनेश पुनेथा, पश्चिम विभागाचे-सीईओ, अपोलो हॉस्पिटल्स




म्हणाले,"रुग्णालयात आणि रुग्णालयाच्या बाहेरही आपत्कालीन सेवांची साखळी अधिक मजबूत करणे हाच आमचा नेहमीच मुख्य हेतू राहिला आहे. या प्रगत लाइफ-सपोर्ट रुग्णवाहिकांचा समावेशामुळे जीवन वाचविण्यासाठी निर्णायक ठरणार्या सुरुवातीच्या काळात रुग्णांपर्यंत सेवा पोहोचण्याची आमची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. आरोग्यसेवा संस्था आणि उदार उद्योजकीय संस्था एकत्र येतात तेव्हा समाजासाठी किती मोठे काम उभे राहू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे."

सुश्री सुधा झिजारिया, सीएसआर ऑपरेशन्स प्रमुख, बिलियन हार्ट्स बीटिंग यांनी व्यक्त केले,"गरजूंपर्यंत मदत किती वेगाने पोहोचते, याद्वारेच आम्ही यशाचे मोजमाप करतो. या रुग्णवाहिका वैद्यकीय संकट आणि उपचार यांच्यातील महत्त्वाची दरी भरुन काढतील- रुग्णालयांपासून घरांपर्यंत, शहरांपासून समुदायांपर्यंत हे आमचे ध्येय सुनिश्चित करतील."

प्री-हॉस्पिटल केअरचे महत्त्व अधोरेखित करताना अपोलो हॉस्पिटल्सच्या पश्चिमी क्षेत्रातील आपत्कालीन विभागाचे संचालक डॉ. नितीन जगासिया म्हणाले,"जेव्हा मदतीसाठी पहिला फोन येतो तेव्हाच आपत्कालीन उपचारांची सुरुवात होते, रुग्णालयात पोहोचल्यावर नव्हे. या रुग्णवाहिका म्हणजे चालते फिरते अतिदक्षता विभाग असून त्या जीवन वाचविण्यासाठी निर्णायक ठरणार्या सुरुवातीच्या काळात तज्ज्ञांद्वारे उपचार देण्याकरिता सज्ज आहेत. या सहयोगामुळे आमची सेवा अधिक व्यापक होणार आहे तसेच वेळ वाचवण्याचे आणि जीवन वाचवण्याचे आमचे ध्येय साध्य करण्यास अधिक क्षमता मिळेल."

## राज्यात वाघ, बिबट्या, वन्यप्राण्यांची दहशत; हल्ल्यात १० महिन्यांत ४७ जणांचा मृत्यू

**मुंबई :** मानवी वस्तीत वाघ, बिबट्यासह अन्य वन्यप्राण्यांचा वावर वाढला असून मनुष्यावर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. गेल्या १० महिन्यांत वाघ, बिबट्या यांसह वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ४७ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती राज्याच्या वन विभागाने दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे. गेल्या पाच वर्षांत वाघाच्या हल्ल्यात २५० तर बिबट्यांच्या हल्ल्यात ८७ अशा एकूण ३३७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती उघडकीस आली आहे.

वाघ, बिबट्या रानडुकरे, कोल्हे, रानगवा या प्राण्यांचा जिल्हा, तालुका आणि आता शहरी भागात मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे. मानवी वस्तीत वाघ, बिबट्या, रानडुकरे, कोल्हे, तरस, अस्वल, लांडगा, माकड खोकड या प्राण्यांचा शिरकाव वाढत असून मनुष्य व पशुपक्ष्यांवर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. गेल्या पाच वर्षांत वाघ, बिबट्या, रानडुकरे, कोल्हे, तरस, रानगवा या प्राण्यांच्या हल्ल्यात तब्बल ३७७ जणांचा मृत्यू झाला आहे, ल्याची धक्कादायक माहिती राज्याच्या वन विभागाने दिलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे. दरम्यान, वाघाच्या हल्ल्यात मानवाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत करण्यात येते, असे वन विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.



**प्राण्यांच्या वस्तीत माणसांची घुसखोरी**

मुंबई शहरांसह राज्याचा विकास झपाट्याने होत असून मानवाने प्राण्यांच्या वस्तीत घुसखोरी केली आहे. त्यामुळे सहाजिकच प्राण्यांचा लोकवस्ती वावर वाढला आहे. जंगलातील झाडांची खुलेआम कत्तल होत असून प्राणी आपले जीवन जगण्यासाठी मानवी वस्तीत पलायन करत आहेत. राज्यात गेल्या काही वर्षात वाघांच्या हल्ल्या पाठोपाठ बिबट्यांच्या हल्ल्यात वाढ झाली आहे. त्यामुळे आता मानव-वाघ संघर्षासोबत मानव -बिबट्या संघर्षात वाढ झाली आहे. राज्य सरकारच्या वन विभागाच्या माध्यमातून विविध उपाययोजना करण्यात येत असल्या तरी प्राण्यांच्या वस्तीत मानवाची घुसखोरी याला कारणीभूत आहे, असे प्राणीप्रेमींचे म्हणणे आहे.

**मृत्यूची आकडेवारी**

■ वर्ष २०२१-२२ दरम्यान वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ८४ जणांचा मृत्यू झाला.

■ वर्ष २०२२-२३ मध्ये ही संख्या वाढून १०९ वर पोहोचली.

■ वर्ष २०२३-२४ मध्ये मानव मृत्यूची संख्या ६३ इतकी नोंदवली गेली.

■ वर्ष २०२४-२५ दरम्यान ६८ जणांचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात बळी पडल्याची नोंद आहे.

■ तर २०२५-२६ या चालू वर्षात आतापर्यंत ५३ मृत्यू नोंदवले गेले आहेत.

## बीव्हीआयएमएसआर व आयएसटीडी नवी मुंबईतर्फे ‘कॉर्पोरेट एक्स्पेक्टेशन्स’ विषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च (बीव्हीआयएमएसआर) आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (आयएसटीडी), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने “कॉर्पोरेट एक्स्पेक्टेशन्स फ्रॉम टुडेज मॅनेजमेंट ग्रॅज्युएट्स” या विषयावर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन ८ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले.

या सत्रासाठी बीव्हीआयएमएसआरच्या माजी विद्यार्थिनी आणि एनएसई क्लिअरिंग लिमिटेड, मुंबई यांच्या असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट – ह्यूमन रिसोर्सेस ईर्षा काळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी युवा व्यवस्थापन पदवीधारकांकडून उद्योगजगताच्या असलेल्या अपेक्षा, आधुनिक कौशल्यांचे वाढते महत्त्व, तसेच करिअरमध्ये प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या व्यावहारिक क्षमतांबाबत सखोल मार्गदर्शन केले. सत्रात उपस्थित विद्यार्थ्यांना उद्योगातील बदलते प्रवाह, रोजगाराच्या नवीन संधी आणि कॉर्पोरेट जगतातील वास्तविक अपेक्षांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अंजली कळसे, संचालक – बीव्हीआयएमएसआर, यांनी सत्राचे उद्घाटन करताना ईर्षा काळे यांच्या प्रेरणादायी व्यावसायिक प्रवासाची माहिती विद्यार्थ्यांसमोर ठेवली आणि त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले.

डॉ. वैशाली पाटील, अध्यक्षा – आयएसटीडी नवी मुंबई, यांनी विद्यार्थ्यांना अशा शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभागातून सातत्यपूर्ण ज्ञानवृद्धी साधण्याचे आवाहन केले.डॉ. कुलदीप भालेराव, चीफ मेंटर – ह्यूमन कॅपिटल क्लब व ऑपरेशन्स क्लब, बीव्हीआयएमएसआर तसेच सचिव – आयएसटीडी नवी मुंबई, यांनी उद्योग–शैक्षणिक सहकार्याचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. विलासराव कदम (कॅम्पस डायरेक्टर, भारती विद्यापीठ नवी मुंबई), डॉ. अंजली कळसे आणि डॉ. वैशाली पाटील यांचे त्यांनी विशेष आभार मानले. तसेच डॉ. अविनाश धवन, इमॅन्युएल जोसेफ, श्रेया गुप्ता, शुभांगी मिश्रा, युवराज पाटील आणि सलील लिमण यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

# `संगीत के सप्तरंग’ने उलव्यातील भूमिपुत्र भवनमधील रसिक मंत्रमुग्ध

## महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते दीपप्रज्वलनानंतर संगीत मैफल रंगली

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** उरण उत्कर्ष समितीचे संस्थापक-अध्यक्ष आणि सुमारे चाळीस वर्षे राजकीय वलय निर्माण करणारे गोपाळ पाटील हे संगीतप्रेमीही आहेत. त्यांनी निर्मिती केलेला `संगीत के सप्तरंग’ हा हिंदी गाण्यांचा ऑकेस्ट्रा रविवारी उलव्यातील भूमिपुत्र येथे रंगला. महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते दीपप्रज्वल केल्यानंतर संगीत मैफल सुरू झाली.

यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "स्थानिक कलाकारांना संधी मिळावी, धकाधकीच्या जीवनात पिचलेल्या आणि संगीताची आवड असणाऱ्या रसिकांना आनंद मिळावा, यासाठी मी आग्रही असतो. त्यामुळे कलाकारांना सहकार्य करण्याची माझी भूमिका कायम आहे. गोपाळ पाटील हे उत्कृष्ट कबड्डीपटू, धावपटू आणि मराठी



अनेक नाटकांतून अभिनय करून पारितोषिक विजेते अष्टपैलू कलाकार आहेत. त्यांचे सामाजिक काम आणि भारदस्त आवाज आजही कायम आहे; परंतु आता त्यांनी आवड जोपासण्यासाठी संगीत क्षेत्रात घेतलेली उडी कौतुकास्पद आहे. त्यामुळे त्यांचे अभिनंदन आणि मनापासून शुभेच्छा!"

या संगीत मैफलीची सुरुवात धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहून झाली. 'पूर्णिमा' चित्रपटातील धर्मेंद्र आणि मिना कुमारी यांच्यावर चित्रित झालेल्या 'हमसफर हम मेरे हम सफर' या गोपाळ पाटील आणि आकांक्षा भोईर यांनी गायलेल्या गीताने सुरुवात झाली. त्यानंतर 'हिरो' चित्रपटातील 'बिछडे कभी हम बरसो' या उमंग गोस्वामी यांनी सादर केलेल्या गीताने वन्समोअर मिळवला. 'प्रीतीच्या चांद राती', 'ए बंधन तो प्यार का बंधन है' या 'करण-अर्जुन' चित्रपटातील गीताने संगीत मैफलीची सांगता झाली.

उमंग गोस्वामी, दक्षता स्वरूप, आकांक्षा भोईर, संगीता डे, महेंद्र कारले, राजा भोसले, राहील शेख, रवि नाईक यांच्या समुधर आवाजाने संगीत रसिक मंत्रमुग्ध झाले होते. किरण तोमर यांच्या संगीत संयोजनाने चार चांद लावले. हरिष मोकल यांच्या सूत्रसंचालनाने हिंदी चित्रपटसृष्टीतील जुन्या कलाकारांच्या गमतीजमती अनुभवायला मिळाल्या.

यावेळी कॉ. भूषण पाटील, साई मंदिर व्हायचे अध्यक्ष रविशेठ पाटील, नरसू पाटील, अॅड. डी. के. पाटील, नरेश रहाळकर, सुधाकर पाटील, विकास नाईक, सदानंद गायकवाड, कृष्णा बा. पाटील, भाऊशेठ पाटील, शरद ठाकूर, मिलिंद पाडगावकर आदी मान्यवर उपस्थित होते. या संगीत मैफलीची मुख्य प्रायोजक महेंद्रशेठ घरत संस्थापक- अध्यक्ष असलेली शेलघर येथील `यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था’ होती. आई इन्फ्रा, टीआयपीएल आदी सहप्रायोजक होते. या कार्यक्रमाला धनाजी ठाकूर, भावना घाणेकर यांचेही सहकार्य लाभले.

## केऱ्हाळा शाळेचा 'नवोदय' दिशादर्शक उपक्रम; २८३ विद्यार्थ्यांची अभिरूप चाचणी उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे द्वार मानल्या जाणाऱ्या 'जवाहर नवोदय विद्यालय' प्रवेश परीक्षेची भीती दूर करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेचा वास्तवदर्शी अनुभव देण्यासाठी केऱ्हाळा (ता. सिल्लोड) येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक आदर्श शाळेने एक स्तुत्य पाऊल उचलले आहे. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून शाळेत नुकतीच 'जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश अभिरूप चाचणी' (Mock Test) अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा ही ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी संधी असते. मात्र, प्रत्यक्ष परीक्षेचा सराव नसल्याने अनेकदा हुशार विद्यार्थीही दडपणाखाली येतात. ही उणीव



भरून काढण्यासाठी पीएमश्री केऱ्हाळा शाळेने हा अभिनव उपक्रम हाती घेतला. या उपक्रमात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २०० हून अधिक शाळांमधील २८३ प्रज्ञावान विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. केवळ परीक्षा घेऊन न थांबता, परीक्षा संपताच त्वरित निकाल जाहीर करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. या तत्परतेमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक रामचंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख रमेश पवार यांच्या नियोजनाखाली हा उपक्रम पार पडला. या यशासाठी शिक्षक शेख चांद, श्रीनिवास जाधव, सोमीनाथ राणे, वंदना साबळे, महानंदा राजपूत, रत्नकला इंगळे, विभा मेश्राम, सुनीता निभोरे, विद्या सरदार, स्वप्नजा पाटील, महेंद्र सूर्यवंशी, सदानंदी दोडके, कविता तेली, पूनम सोनवणे, गणेश गोरे, नानासाहेब शिंदे, जुबेर कुरेशी, अतुल कासारे, भक्ती जाधव, सोपान सोमासे, रावसाहेब ढवळे, संजय सोनकांबळे, काशिनाथ गुजर, विनोद भुतेकर, संतोष प्रसाद, सुरेंद्र बबीरवाल, गणेश शिंदे, शितल महाले आणि सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले.या उपक्रमास जिल्हा शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी प्रोत्साहन दिले. तसेच सरपंच उषाताई पांढरे, शालेय अध्यक्ष अर्जुन वाघ, शिक्षणतज्ज्ञ सूर्यभान बनसोड, उर्दू शालेय अध्यक्ष साबेर शेख, अजिनाथ भिंगारे आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले

> "या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती नक्कीच कमी होईल आणि ते आत्मविश्वासाने मुख्य परीक्षेला सामोरे जातील. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी केऱ्हाळा शाळेने राबवलेला हा उपक्रम अत्यंत आदर्श आणि प्रशंसनीय आहे."
>
> - रमेश ठाकूर, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड


## खांदा कॉलनीत अंशुमन चषकाचे आयोजन तरूण युवकांना प्रोत्साहन

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे :** भारतीय जनता पार्टी पुरस्कृत आणि स्व. संजय भोपी प्रतिष्ठान (SBSC) यांच्या विद्यमाने खांदा कॉलनी मधील खेळाडूंच्या हितासाठी नेहमीच अग्रेसर राहिलेले स्व. संजय भोपी साहेब यांच्या स्मरणार्थ खांदा कॉलनीतील मानाची व भव्य अशी "अंशुमन ट्रॉफी २०२५ (वर्ष ३ रे)" ही क्रिकेट स्पर्धा भारतीय जनता युवा मोर्चा रायगड सरचिटणीस अभिषेक संजय भोपी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक ०७/१२/२०२५ रोजी महात्मा शाळेचे मैदान येथे मोठ्या जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली. स्पर्धेचे उदघाटन खांदा कॉलनीतील अग्रगण्य सामाजिक संस्था आनंदी ग्रुप च्या सन्माननीय सदस्यांच्या हस्ते संपन्न झाले. या स्पर्धेला लाभलेल्या पनवेलचे कार्यसम्राट आमदार माननीय श्री. प्रशांतदादा ठाकूर साहेब, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष श्री. अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस श्री. नितीनभाई पाटील, माजी उपमहापौर सौ. सीताताई पाटील, माजी नगरसेवक श्री. एकनाथदादा गायकवाड यांच्यासह इतर



मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शनामुळे खेळाडूंच्या ऊर्जेत भर पडली. याचबरोबर परिसरातील राजकीय, सामाजिक व व्यवसायिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी स्पर्धेला भेट देत उत्कृष्ठ व दर्जेदार आयोजनाबद्दल अभिषेक संजय भोपी व आयोजक मित्र परिवाराचे कौतुकास्पद अभिनंदन केले. या स्पर्धेत एकूण १३ संघानी सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूस मालिकावीर किताबासाठी सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून क्रिकेट प्रेमींना मैदानावरील रणसंग्रामातील रंगतदार व चुरशीच्या सामन्यांच्या पर्वणीचा अनुभव घेता आला.




## आर एस क्रिकेट क्लब कोटनाका नाका उरण आयोजित "आर एस ट्रॉफी" क्रिकेट स्पर्धा खेळकर वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : आर एस क्रिकेट क्लब कोट नाका उरण आयोजित "आर एस ट्रॉफी" या भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा गुरुवार दिनांक ४ डिसेंबर ते रविवार ७ डिसेंबर रोजी कोटगाव ग्रामस्थ मंडळाचे मैदान पेट्रोल पंपाच्या मागे उरण येथे भरवण्यात आल्या होत्या .या क्रिकेट स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे गेली ३ दशके क्रिकेट प्रेमींच्या हृदयावर अधिराज्य गाजविणारे आर एस क्रिकेट क्लब चे स्पर्धांचे आयोजन, नियोजन आणि संघटन हे उरण तालुक्यात नावाजलेले असल्यामुळे तालुक्यातील संघ या आर एस क्रिकेट क्लब क्रिकेट मालिकेत सहभाग घेण्यासाठी उत्सुक असतात.

गावोगावी या भरणाऱ्या क्रिकेट स्पर्धा या ग्रामीण भारतातील क्रिकेट संस्कृती चा महत्त्वाचा आणि उत्साही भाग आहे. या स्पर्धेमुळे नवोदित खेळाडूंना संधी मिळत याचा मुख्य उद्देश म्हणजे गावागावांमध्ये सलोखा निर्माण करणे आणि तरुणांना खेळाशी जोडून ठेवणे हा होय. या स्पर्धेत साधारणपणे मर्यादित षटकांच्या ३ ते ५ षटकांच्या स्वरूपात सामना असतो. या स्पर्धेच्या बक्षिसांमध्ये आकर्षक चषक रोख



रक्कम किंवा कधी कधी उपयुक्त वस्तू उदाहरणार्थ क्रिकेट किट अशा प्रकारे बक्षीस दिली जातात.

तसेच ग्रामीण भागातील या स्पर्धा केवळ मनोरंजनाचे साधन नसून या सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या आहेत वेगवेगळया गावांचे संघ एकत्र येतात ज्यामुळे गावागावांमध्ये बंधुत्व आणि सलोखा निर्माण होतो. स्पर्धा आयोजित करण्याच्या प्रक्रियेतून गावातील तरुणांमध्ये संघटन कौशल्य व नेतृत्वगुण विकसित होतात अशा स्पर्धांचे आयोजन अनेकदा स्थानिक तरुण मंडळ , ग्रामपंचायत किंवा हौशी क्रिकेट क्लब करत असतात. स्थानिक देणगीदार आणि कधी कधी ग्रामपंचायतीच्या निधीतून या स्पर्धकांसाठी पैसे उभे केले जातात. बहुतांश या स्पर्धा तात्पुरत्या मैदानावर किंवा शेतात भरवल्या जातात. मेहनत घेऊन चांगल्या खेळपट्ट्या बनवल्या जातात.

या क्रिकेट मालिकेत एकूण ३४ संघाने सहभाग घेतला होता प्रथम क्रमांक ५० हजार भव्य चषक द्वितीय क्रमांक २५ हजार भव्य चषक तृतीय क्रमांक १२ हजार ५०० भव्य चषक,चतुर्थ क्रमांक १२हजार ५००आणि भव्य चषक मालिकावीरास सायकल, तसेच सर्वोत्कृष्ट फलंदाज सर्वोत्कृष्ट गोलंदाज आणि सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक याकरता आकर्षक चषक ठेवण्यात आला होता.

आर एस ट्रॉफी क्रिकेट मालिका प्रथम क्रमांक अक्का देवी पाणजे संघ, द्वितीय क्रमांक अक्षय स्मृती मरुआई विंधणे, तृतीय क्रमांक बि.सी.सी भेंडखळ,चौथा क्रमांक सुनील स्पोर्ट्स चिंचपाडा संघाने पटकावला. प्रत्येक सामन्यात सामनावीर म्हणून चषक देऊन खेळाडुस गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट फलंदाज आकाश पाटील विंधणे, सर्वोत्कृष्ट गोलंदाज कविश पाटील भेंडखळ, सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक सतीश मिसाळ, चिंचपाडा, मालिका वीर ठरला साहिल भोईर पाणजे यांना गौरविण्यात आले.

जरी या स्पर्धा हौशी स्वरूपाच्या असल्या तरी यातून अनेक खेळाडू पुढे येतात. अनेक प्रतिभावान खेळाडूंचे शिक्षण या गावोगावी भरणाऱ्या स्पर्धांमधूनच होते. स्थानिक पातळीवर चमकल्यानंतर ते जिल्हा आणि राज्यस्तरीय संघात निवडले जातात. या स्पर्धांमुळे गावातील सर्वोत्तम खेळाडूंना स्थानिक क्रिकेट हिरो म्हणून ओळख मिळते आणि त्यांचा सन्मान होतो.

आर एस ट्रॉफी क्रिकेट स्पर्धा चालू असताना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी मैदानावर येऊन खेळाडूंना प्रोत्साहित केले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धा सुंदररित्या संपन्न होण्यासाठी आर एस क्रिकेट क्लब कोट नाका उरण या टीमचे योगदान महत्त्वाचे आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सार्थ लोकनिती संपादक संतोष वाव्हळ यांचे पिताश्री कै. भाऊसाहेब वाव्हळ यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पुणे वार्ताहर** : सार्थ लोकनिती संपादक संतोष वाव्हळ यांचे वडील कै. भाऊसाहेब सावळेराम वाव्हळ यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम ५ डिसेंबर २०२५ रोजी ढोबळेवाडी जारकरवाडी येथे संपन्न झाला . हा कार्यक्रम त्यांच्या कुटुंबीय आणि ग्रामस्थांच्या सहभागात पार पडला .

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.३० वाजता प्रतिमापूजनाने सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सकाळी ९.०० ते ११.०० वाजता ह.भ.प. प्रतिक्षाताई जाधव महाराज (शिडी) यांच्या हरिकीर्तनाने झाले . या कीर्तनात ज्ञानदिप वारकरी शिक्षण संस्थेचा सहभाग होता त्यामुळे मुळे भक्तांसाठी आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमांतून उपस्थितांना भक्तीभावनेचा अनुभव घेतला. पुण्यस्मरणात संपूर्ण वाव्हळ परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक आणि ढोबळेवाडी-जारकरवाडीतील ग्रामस्थ पुण्यस्मरणात उपस्थित राहून श्रद्धांजली



अर्पण केली. या कार्यक्रमात. कै. भाऊसाहेब सावळेराम वाव्हळ यांना आदरांजली देण्यासाठी पुणे जिल्हा माजी उपाध्यक्ष अरूणभाऊ गिरे माजी सभापती रामचंद्र ढोबळे,सेवा निवृत्त कृषि विस्तार अधिकारी दत्तात्रय भोजने,अहिल्यादेवी धर्मशाला अध्यक्ष जयवंतराव कवितके , सचिव नवनाथ जारकड,PSI जीवराज वाघमारे, जलिंदर भोजने, पुणे जिल्हा महिलाराष्ट्रवादी उपाध्यक्ष रुपाली भोजने , बजरंग देवड़े, हनुमंत तागड़,पंथरीनाथ काकडे ,बाबुराव ढोबळे तसेच सामाजिक,राजकीय,शैक्षणिक शैत्रातील आदी मान्यवर उपस्थित राहिले.

# ४२ वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा

## माणिकनगरच्या सिद्धेश्वर हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** ४२ वर्षांपूर्वीच्या शालेय जीवनातील गोड-आंबट आठवणींना उजाळा देण्यासाठी माणिकनगर (ता. सिल्लोड) येथील सिद्धेश्वर हायस्कूलच्या १९८३ च्या पहिल्या तुकडीतील माजी विद्यार्थी नुकतेच एकत्र आले होते. साठीकडे झुकलेल्या या जुन्या मित्रांनी शाळेच्या प्रांगणात एकत्र येऊन स्नेहमिलनाचा एक भावनिक सोहळा साजरा केला.

१९८० मध्ये साखर कारखान्यातील कामगारांच्या मुलांसाठी सुरू झालेल्या सिद्धेश्वर हायस्कूलमधून १९८३ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी या अनोख्या 'गेट टुगेदर'चे आयोजन केले होते. तब्बल ४२ वर्षांनंतर शाळेच्या आवारात पाऊल ठेवलेल्या या माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जुन्या



आठवणींचा आनंद स्पष्ट दिसत होता. या सोहळयाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ दौड हे होते, तर निवृत्त शिक्षक बापूराव चोरमले आणि नामदेवराव दौड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित नसलेले (निधन पावलेले) शिक्षक आणि वर्गमित्र यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर मात्र आठवणींना उधाण आले! शिक्षण घेत असताना झालेल्या गमतीजमती, शिक्षकांकडून खाल्लेला मार, वर्गमित्र-शिक्षक यांच्यासोबतचे किस्से सांगत सर्वजण मनसोक्त हसले. अतिशय वृद्धत्वाकडे झुकलेले शाळेच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी जमलेले पाहून गावातील नंतरचे विद्यार्थीही त्यांचे अनुभव ऐकण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. या स्नेहमिलनाचा समारोप करताना एक अत्यंत भावनिक आणि गंमतशीर प्रसंग घडला. निवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ दौड यांनी समारोपाच्या वेळी छडीचा मार देऊन या सोहळयाची सांगता केली, ज्याने जुन्या शिस्तीच्या आठवणींना उजाळा मिळाला. हा सोहळा केवळ भेटीचा नव्हे, तर आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या शाळेबद्दल आणि शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा होता.


या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवृत्त पोलिस उपनिरीक्षक अण्णासाहेब साखळे यांनी केले, तर निवृत्त मुख्याध्यापक बाळासाहेब मोकळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शेख दौलत, अण्णा कळम, आप्पा कळम, माणिक सुरडकर, काशिनाथ कळम, प्रभू पुंगळे, सुभाष रोठे, आत्माराम खिल्लारे, रामेश्वर जाधव, जिनेंद्र अन्नदाते, कुमार गवते, सुभाष पवार, भगवान बडक, रामदास बोर्डे, सलीम सय्यद, रंगनाथ पवार, लिंबाजी इधाटे, नारायण मिरगे, प्रभू मिसाळ आदी वर्गमित्र मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

# संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात लवकरच विशेष बैठकीचे आयोजन...

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे)** : वीरशैव कक्कय्या कल्याण मंडळ धारावी मुंबई च्या वतीने सर्व समाज बांधवाना एक विशेष सूचना देण्यात येत आहे की,संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ बाबत विधानसभेत तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा करून सुद्धा अजूनही जीआर निघत नाही. त्यासाठी 2025 रोजी दुसरे आंदोलन समाजाच्या वतीने आझाद मैदान येथे करण्यात आले.पण शासकीय यंत्रणात जीआर काढण्याची तयारी दिसून येत नाही. शासन जाणूनबुजून चालढकल करत आहे काय असेच आता वाटू लागले आहे. तेव्हा पुन्हा एकदा शासनाला जागे करण्यासाठी आंदोलन छेडावे लागेल अथवा समाज बांधवाना आमरण उपोषणाला बसावे लागेल याची तयारी अनेक समाज बांधव करीत आहे.

याविषयी सर्व स्तरावर विचारमंथन करण्यासाठी तसेच कक्कय्या कल्याण मंडळाने




आखलेल्या पुढील कार्यक्रमांची रूपरेषा आणि त्यावर काय उपाय योजना करता येईल यासाठी येत्या फेब्रुवारी महिन्यात एक विशेष महासभा लावण्याचा मंडळाने निर्णय घेतला आहे . हा निर्णय दिनांक -5/12/ 2025 रोजी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत झाला.त्या बैठकीमध्ये महामंडळाचे काय ? या विषयावर चर्चा विनिमय करण्यात आले. यावेळी अध्यक्ष - महादेव कृष्णा शिंदे,उपाध्यक्ष - विश्वनाथ सि. शिंदे,सचिव- यशवंत ब. नारायणकर,प्रवक्ते - रवींद्र रूपचंद शिंदे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना महासभेसाठी आमंत्रित करण्यात येणार आहे .या महासभेत महामंडळा विषयी महत्त्वाची भूमिका ठरवण्यात येणार आहे.समाज बांधवाच्या विचारमंतनातून हा निर्णय घेण्यात येणार आहे .तरी समाज वांधवानी फेब्रुवारी महिण्यात होणाऱ्या महा सभेला मोठया संख्येने उपस्थित रहावे.लवकरच महासभेचे ठिकाण आणि तारीख कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कक्कय्या कल्याण मंडळाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# मुंबई प्रभाग १४४ मध्ये राजकीय भूकंप ; महिला शाखा संघटक ममता भंडारी यांचा शिवसेनेचा राजीनामा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर)** : मुंबई महानगरपालिका निवडणूक जश जशी जवळ येत आहे.तसतसे पक्षामध्ये पक्षप्रवेशाची चढाओढ बघायला मिळत असली तरी कोणत्याही पक्षात न राहता स्वबळावर आपला अपक्ष उमेदवार अर्ज भरून जिंकण्याची जिद्द उराशी बाळगून प्रभाग क्रमांक १४४ मध्ये मोठी राजकीय घडामोड घडली असून, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) महिला शाखा संघटक व संपर्क प्रमुख सौ. ममता मधुकर भंडारी यांनी पक्षाला धडाकेबाज राजीनामा दिला आहे. प्रभाग खुला वर्ग झाल्याने पक्षाला जागा न मिळाल्याचा उल्लेख करत त्यांनी निवडणूक अपक्ष म्हणून लढविण्याचा निर्णय घेतल्याचे आपल्या राजीनाम्यात स्पष्ट केले आहे.

दीर्घकाळ प्रभागात कार्यरत राहून संघटना वाढीसाठी प्रयत्न केले असून, जनसंपर्क आणि



जनविश्वास मोठ्या प्रमाणात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. पक्षाने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त करत असतानाच, प्रभागातील जनतेच्या अपेक्षांमुळे स्वतंत्र उमेदवारी आवश्यक झाल्याचे त्यांनी नमूद केले.ममता भंडारी यांच्या या निर्णयामुळे प्रभाग १४४ मधील आगामी निवडणुकीचे राजकारण तापण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

# उरण–नेरूळ रेल्वे फेऱ्यांत वाढ ; केंद्रीय रेल्वे मंत्री अशिवनी वैष्णव यांचे आमदार महेश बालदी यांनी मानले आभार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : उरण–नेरूळ रेल्वे मार्गावरील फेऱ्यांमध्ये वाढ करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. उरण परिसरातील नागरिक, दैनंदिन प्रवासी, विद्यार्थी, महिला व व्यावसायिक यांच्या वाढत्या मागणीची दखल घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

आमदार महेश बालदी यांची मागणी व सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने मंजूर केलेल्या वाढीव लोकल फेऱ्या नववर्षाच्या प्रारंभी सुरू होणार आहेत. निवडणूक



आचारसंहिता संपल्यानंतर सकाळी ६.०५ वाजता सुटणारी पहिली गाडी तसेच रात्री उशीरा धावणाऱ्या अतिरिक्त लोकल्स यांचा औपचारिक शुभारंभ केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. फेऱ्यांच्या वाढीमुळे उरण, जासई, खारकोपर, गव्हाण आणि नेरूळ या परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. उरण–नेरूळ मार्ग हा उरण उपनगरे, जेएनपीटी क्षेत्र, औद्योगिक पट्टा तसेच नवी मुंबई–मुंबईमध्ये कामधंद्यासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढीव फेऱ्यांमुळे प्रवासाचा वेळ कमी होऊन सकाळ-संध्याकाळच्या गर्दीचा ताणही कमी होणार आहे. या भेटीत केंद्रीय मंत्र्यांनी प्रकल्पासंदर्भातील पुढील आवश्यक सुविधांच्या पुरवठ्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. रेल्वे सेवांचा विस्तार हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. उरण–नेरूळ रेल्वे फेऱ्यांमध्ये वाढ होणे हा उरण व आसपासच्या परिसरासाठी विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरेल, तसेच दैनंदिन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित व सोयीस्कर बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलेल्या विशेष सहकार्याबद्दल आमदार महेश बालदी यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

# शिक्षक आ . किरणराव सरनाईक यांची भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या शाळा येथे सदिच्छा भेट...!

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर :** अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनी दिनांक 4 डिसेंबर 2025 रोजी रिसोड येथील भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला सदिच्छा भेट दिली, यावेळी शाळेच्या प्राचार्या मंजुषा देशमुख, पर्यवेक्षक एस.डी.डहाळके यांनी शाळेच्या वतीने आमदार सरनाईक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोड चे प्राचार्य संजयराव देशमुख, भारत माध्यमिक कन्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षक सुधीर देशमुख हे उपस्थित होते.

याप्रसंगी शिक्षकांशी हितगुज साधताना आमदार सरनाईक यांनी सांगितले की मी विधान परिषदेमधील शिक्षकांचा प्रतिनिधी आहे, शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सतत प्रयत्न करत आलेलो असून



पुढेही त्यासाठी प्रयत्न करत राहणार आहे. 5 डिसेंबरला सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी सुद्धा टीईटी परीक्षा अनिवार्य केल्यासंदर्भात शिक्षकांनी जे आंदोलन उभे केले आहे त्या आंदोलनास माझा पूर्ण पाठिंबा असून आपण या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाच्या विरोधात आवाज उठवू असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. 2024 - 25 च्या संच मान्यतेवर आधारित अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न मार्गी लावतांना आपण शासनाला तो निर्णय मागे घेण्यास भाग पाडले असून त्यासारखेच सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांसाठी टीईटी पात्रतेच्या ज्याचक अटी मधून बाहेर पडण्यासाठी आपण सर्व ताकतीनिशी आंदोलन करून शासनास हा निर्णय मागे घेण्यास भाग पाडू असेही ते यावेळी बोलताना म्हणाले. उपस्थित शिक्षकांनी आपल्या शिक्षण क्षेत्राशी संबंधित काही समस्या आमदार सरनाईक यांच्यासमोर मांडल्या त्यावर उत्तर देत आमदार सरनाईक यांनी त्यांच्या समस्यांचे निरसनही केले. भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या शाळा येथील अंशतः अनुदानित शिक्षकांनी टप्पा वाढ करण्यामध्ये आमदार सरनाईक साहेब यांनी टप्पा वाढ मिळवून देण्यामध्ये शिक्षकांच्या पाठीराख्याची भूमिका बजावल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व आभारही मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री सुधीर देशमुख यांनी केले.

# पाटोद्याच्या जनता बँड ने पार केली शंभरी...!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (शेख महेशर) -** एका बाजूला बँजो, डि जे, सारख्या वाद्यांच्या जमान्यात ढोलकी, सुरसनई, ब्रास बँड हे संगीत वाद्य प्रकार कालबाह्य होत आहेत. हि पारंपारिक वाद्य कला टिकावी या साठी बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील मास्तर शफीक सय्यद, सरफराज सय्यद, सईद सय्यद या बापलेकांनी बँड वादनाची कला मोठ्या हिमतीने जपली आहे. चौथी पर्यंत शिक्षण घेतलेल्या शफीभाई यांनी या कलेला आपलं संपुर्ण जीवन समर्पित केले आहे. वयाच्या १३ वर्षा पासून शफीभाई हे क्लारोनेट हे वाद्य वाजविण्याची कला जपत आहेत. मास्तर शफीभाईंचे आजोबा फत्तू सय्यद व वडील बादशाह सय्यद यांच्या पासून बँड कला वादनाचे धडे घेतले आहेत. एका बाजूला डिजे, बँजो या सारख्या इलेक्ट्रानिक वाद्यांच्या आधुनिक जमानाच्या धुमधडाक्यात पारंपारिक क्लारोनेट, ट्राम्पेट, ढोल, ताशा, सॅक्सोफोन, ड्रम, ढोलकी या वाद्यांचे सुमधूर संगीत नामशेष होण्याच्या मार्गावर असताना सय्यद



पिता पुत्रानी पारंपारिक ब्रॉस बँड वादनाची कला जपून महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यात आपल्या कलेला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे. वाढती महागाई, कामगाराचे मानधन, प्रवास खर्च या सर्वच अडचणीवर मात करून गेल्या शंभर वर्षा पासून या पारंपारिक कलेची जपणूक केली आहे. महागाईच्या जमान्यात परवडत नसले तरी केवळ कलेची जपणूक व्हावी मनाला आनंद मिळावा या साठी हि कला सय्यद कुटुंबाने जपली आहे. पैशा पेक्षा मिळणारी सामाजिक प्रतिष्ठा मनाला आनंद देऊन जाते असे मत मास्तर शफीभाई यांनी बोलताना व्यक्त केले. एक वेळ आपण हि पहा पाटोदा जिल्हा बीड च्या जनता ब्रास बँडच्या कलेचा नजराणा...!

# शेतकऱ्यांच्या कापसाच्या ढिगाला अचानक लागली आग

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी - अनिल ससाने**

जाफराबाद तालुक्यातील पापळ येथील शेतकरी दामुधर देवराव इंगळे यांच्या घरातील कापसाच्या ढिगाला आग लागून जवळपास 20 क्विंटल कापूस जळाला रविवारी सकाळी नऊ-साडेनऊच्या सुमारात कापसाला अचानक आग लागली असता गावातील गावकऱ्यांनी धाव घेऊन आग आटोक्यात आल्यानंतर तलाठी तांगडे साहेब यांना फोन केला तलाठ्याने येऊन घटनास्थळी पंचनामा केला पंचनामा करत असताना गावातील सरपंच,नामदेव कुहिरे पोलीस पाटील,



नक्कीम शेख , कृष्णा जाधव, अनिल ससाने, परमेश्वर पवार,लक्ष्मण खडसे, विजय ससाने, दामोदर इंगळे इत्यादी उपस्थित होते दैनिक युवक आधारची प्रतिनिधी यांनी तलाठी यांना विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की इंगळे यांचा 20 क्विंटल कापुस जळालेला आहे (दीड लाखाची) नुकसान झाली आहे व इंगळे यांना नुकसान भरपाई मिळवण्यासाठी प्रयत्न करू असे ते म्हणाले

# मुदगल परिसरात अवैध वृक्षतोड जोरात; पर्यावरण संरक्षण नियमांची पायमल्ली

**दैनिक युवक आधार**

**अशोक नवघरे/पाथरी** : तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावरील गावात सध्या वृक्षतोड रात्रीचा दिवस करून अवैध वृक्षतोड जोरदार होत आहे पाथरी तालुक्यांत सध्या पर्यावरणाचा अक्षरशः बोजावार सुरू आहे दिवसेंदिवस झाडांची अवैध वृक्षतोड वाढत असून गावोगावी रस्त्याच्या कडेला शिवारातील मोकळ्या जागांवर तसेच अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात आहे तर पावसाळा संपताच आता या अवैध वृक्षतोडीला वेग आला असल्याचे चित्र गोदावरी नदीच्या काठावर मुदगल विटा लिंबा कुंभारी वांगी थार आदी गावांत दिसून येत आहे ही अवैध हालचाल भरदिवसा व रात्री अपरात्री सुरू आहे यांच्या विरोधात संबंधित अधिकारी कोणतीही ठोस कारवाई होत नाही स्थानिक पर्यावरणप्रेमीचे म्हणणे आहे की वन विभागातील काही अधिकारी कुंभकर्णी झोपेत गेले आहेत दररोज उभी झाडे जमीनदोस्त होत असताना उन्हाळ्यात उष्णतेची तीव्रता पाण्याची टंचाई आणि सावलीअभावी



लोकांच्या जगण्यावर परिणाम होणार हे निश्चित आहे जर ही बेफिकिरी आशीच सुरू राहीली तर काही वर्षांत गोदावरी काठ हिरवाईचा प्रदेश न राहता राखाडी वाळवंट बनले अशी भीती नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे वनविभागाची निष्क्रियता समतोल बिघडत आहे आज जी वृक्षतोड केली जाते ती फक्त लाकुड नव्हे तर पुढच्या पिढ्यांच्या आयुष्याचा श्वास कापला जात आहे पर्यावरण संरक्षण नियमांची पायमल्ली सरकारने दिलेल्या पर्यावरण संरक्षणाच्या आदेशाचा उघड उघड भंग होत असतानाही वन विभाग यावर मौन बाळगतोय तर वनविभागाने मुदगल परिसरातील अवैध वृक्षतोड तात्काळ थांबवावे अशी मागणी पर्यावरण संरक्षण प्रेमी करत आहेत.

## थोडक्यात

### स्वामी समर्थ सेवा केंद्रात सांगता सोहळा संपन्न; २१५ सेवेकऱ्यांची उपस्थिती



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** शहरातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात धार्मिक वातावरणात वार्षिक उपासना व कार्यक्रमाची सांगता भक्तीभावाने पार पडली.या सोहळ्यास २१५ सेवेकऱ्यांनी उपस्थित राहून सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सांगता कीर्तन, नामस्मरण व आरतीने करण्यात आली.भक्तांनी स्वामी समर्थ महाराजांच्या जयघोषात अध्यात्मिक ऊर्जा अनुभवली.यावेळी उपस्थित सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भक्त आणि सेवेकऱ्यांनी अध्यात्मिक उत्साहात सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### मूंबई नॅशनल हॅन्डलूम डे कार्यक्रमामध्ये ईट प्ले रीडचा आनंददायी सहभाग




**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** मूंबई येथे नॅशनल हॅन्डलूम डे इव्हेंट झाले, यावेळी अनेक कलाकारांची उपस्थिती होती राजकीय नामांकित यांची देखील उपस्थिती होती. हे औचित्य साधुन ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या राजदूतांनी या गौरव सोहळ्यात सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व साम्यान्यापर्यंत तसेच विशेष अतिथीनाही दिला, या कार्यक्रमांत विशेष हजेरी लाभली ती दिगज्ज कलाकारांची. यावेळी अनेक नृत्य आविष्कार सादर झाले. ईट प्ले रीडचा हा उल्लेखनीय प्रयत्न मोठ्या प्रमाणावर समुदायाकडून मान्यता आणि समर्थनास पात्र आहे हे या सर्व मान्यवारांच्या सन्मानाने दिसून येत आहे.

### खांदेश्वर पोलिसांना मिळून आली हरवलेली महिला



**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** खांदेश्वर पोलिसांना एक हरवलेली महिला मिळून आली असून तिच्या नातेवाईकांचा शोध खांदेश्वर पोलीस करीत आहेत . सदरची महिलाही खान्देश्वर पोलीस स्टेशन हद्दीत मीळुनआलेली असून तिचा पत्ता तिच्या लक्षात नाही व तीचे नाव आरती जाधव ( वय ३६ ) माहीम येथून आलेली आहे. एवढेच सांगत आहे.जर कोणी यांच्या परिचयाचे असतील तर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश भद्रे फोन नंबर 9850641629 येथे संपर्क साधावा .

### पनवेल येथील एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी केली उत्कृष्ट कामगिरी




**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल येथील एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी पिंपरी-चिंचवड येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत पनवेलचे नाव उज्ज्वल केले आहे. क्लबच्या अहाना सोमण, सई कारंडे, नेहा झांजे, सम्राट पाटील, संस्कार सूर्यवंशी, आरव कदम या खेळाडूंनी या स्पर्धेत विजय संपादन केला, तर विहंग याला उपविजेतेपदाचा मान मिळवला.एमपीएसए बॉक्सिंग क्लबच्या सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत अभूतपूर्व उत्साह आणि दमदार प्रदर्शन दाखवले. खेळाडूंच्या या यशामुळे क्लबचे सर्वत्र कौतुक होत आहे.खेळाडूंच्या या यशामध्ये त्यांचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे आणि अथक परिश्रमामुळेच क्लबचे खेळाडू हे उत्कृष्ट प्रदर्शन करू शकले, असे मत क्लबच्या सदस्यांनी व्यक्त केले.

# 12 डिसेंबर रोजी महाराष्ट्र स्टेट असोसिएशन यांच्या वतीने नागपूर अधिवेशनावर मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

नागपूर - महाराष्ट्र स्टेट बँक मित्र असोसिएशनच्या वतीने, राज्यातील सर्व बँक मित्रांच्या विविध तातडीच्या प्रश्नांवर १२ डिसेंबर रोजी एका मोर्चाचे आयोजन यशवंत स्टेडियम सीताबर्डी नागपूर ते विधान भवन नागपूर येथे सकाळी १० वाजता करण्यातवले आहे. या मोर्चात राज्यभरातील एक हजार बँक मित्र सहभागी होत आहेत.

भारत सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या पुढाकाराने देशातील प्रत्येक नागरिकाला औपचारिक बँकिंग सेवांशी जोडण्यासाठी आर्थिक समावेशकतेचा व्यापक उपक्रम राबविण्यात आला. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रधानमंत्री जन धन योजनेने या उपक्रमाला अभूतपूर्व गती दिली.

रजि. : ए.एल.सी./कार्यालय-१७/११७८३
(महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉईज फेडरेशन संलग्न)
C/o : दादीसेठहाऊस, १ ला मजला, नानाभाईलेन, फोर्ट, मुंबई - ४०००२३.
**महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशन**
AIBEA

देशभरातील ५७ कोटींहून अधिक खाती आणि २.७४ लाख कोटी रुपयांची बचत औपचारिक बँकिंग प्रणालीत आणण्यात आली असून, त्यापैकी ३.६४ कोटी खाती महाराष्ट्रात उघडण्यात आली आहेत, ज्यांची एकत्रित बचत १८,०१० कोटी रुपये आहे. या खात्यांपैकी ९०% खाती आधार संलग्न असून २.५६ कोटी रुपे कार्ड वितरित करण्यात आले आहेत. १.६४ कोटी लाभार्थींना जीवन ज्योती विमा तर ३.३१ कोटींना आरोग्य विमा कवच देण्यात आले आहे. तसेच ५५.३० लाख नागरिकांना अटल पेन्शन योजनाअंतर्गत सुरक्षितता प्राप्त झाली आहे. राज्य व केंद्र सरकारच्या सर्व अनुदान योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, किसान कल्याण योजना इत्यादींचे वितरण ह्याच खात्यांतून होते.कोविड महामारीच्या अत्यंत कठीण काळात, जीवाची पर्वा न करता बँक मित्रांनी अखंडपणे सेवा देत सरकारच्या योजनांची अंमलबजावणी सुरळीतपणे केली. आज राज्यात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधून वीस हजारांहून अधिक बँक मित्र ग्रामीण भाग, वाडी-वस्ती, दुर्गम पाडे अशा सर्व ठिकाणी जनतेसाठी बँकिंगची दारे उघडी ठेवून कार्यरत आहेत. लाडकी बहिण योजना तसेच इतर अनेक महत्त्वाच्या योजनांची अल्पावधीत प्रभावी अंमलबजावणी बँक मित्रांशिवाय शक्यच नव्हती.

दुर्दैवाने मागील काही वर्षांत बँक मित्रांच्या सेवेशी संबंधित गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत—प्रारंभी बँकेमार्फत थेट कंत्राटी नियुक्ती केली जात होती; मात्र आता मध्यस्थ कंपन्यांमार्फत कंत्राटी नियुक्ती दिली जाते.सेवेत कोणतीही सुरक्षा नाही, निश्चित सेवा अटी नाहीत.किमान वेतन, रजा, वैद्यकीय सुविधा, प्रविडेंट फंड यापैकी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. मिळणारे कमिशन अत्यंत कमी असून, अनेक ठिकाणी कामाची उपलब्धता कमी असताना अनावश्यकपणे अधिक बँक मित्र नेमले जात असल्याने उत्पन्न आणखी घटले आहे.वाढत्या कुटुंब जबाबदाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणी तीव्र झाल्या आहेत व काही सहकाऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचीही दुःखद परिस्थिती निर्माण झाली आहे.या मागण्यांची यादी आपणास संग्लग्न स्वरूपात जोडली आहे. राज्याचे मुख्यमंत्री तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष या नात्याने—बँक मित्रांचे संरक्षक म्हणून मुख्यमंत्री यांनी—हस्तक्षेप करून योग्य तो न्याय मिळवून द्यावा या हेतूने संघटनेचे शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्री यांना भेटत आहे. याशिवाय हे शिष्टमंडळ नागपूर स्थित रिझर्व्ह बँकेचे रिजनल डायरेक्टर यांना देखील भेटून आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करणार आहे. यात अशी मागणी करण्यात येत आहे की राज्य स्तरीय बँकर्स समितीने राज्य स्तरीय बँकर्स समितीच्या पुढील सभेत बँक मित्र संघटनेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली स्वतंत्र समिती गठीत करावी व निश्चित कालावधीत बँक मित्रांच्या प्रश्नांची सोडवणूक करावी.

## पायापडणीच्या खर्चाला फाटा देऊन अनाथाश्रमातील मुलांना ड्रेस वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय :** सणसर ता इंदापूर येथील श्रीमती सारिका व कै प्रकाश राजाराम भोसले यांचे जेष्ठ चिरंजीव आणि गरीब उद्योग समूहाचे सर्वेसर्वा युवा उदयोजक चि.गणेश प्रकाश भोसले यांचा शुभविवाह चि सौ का सानिका टेंभेकर हिच्या सोबत कारेगाव ता शिरूर जि.पुणे यांचा शुभविवाह दि.5 डिसेंबर रोजी सायंकाळी साडे पाच वाजता मोठ्या शाही दिमाखात संप्पन्न झाला. सणसर ता.इंदापूर गावची पारंपरिक रितिरिवाजानुसार लग्नाच्या आदल्या रात्री गावातील सर्व देवदेवतांचा आशिर्वाद घेण्यासाठी नवरा मुलगा किंवा नवरी मुलगी वाजत गाजत घेऊन जात असतात त्यासाठी वाजंत्री घोडा फटाके डीजे लावला जातो.यासाठी खूप मोठा खर्च केला जातो या पाया पडणीसाठी अनावश्यक होत असलेल्या



खर्चाला फाटा देत युवा उदयोजक चि गणेश भोसले व चि रुपेश भोसले यांच्या संकल्पनेतून अनावश्यक होणाऱ्या त्या खर्चाचा सामाजिक बांधलिकी जपण्यासाठी उपयोग करण्यात यावा म्हणून बारामती तालुक्यातील निरावागज येथील अनाथाश्रमा तील जवळपास तीस मुले मुलींना लग्नाच्या ठिकाणी गाडीत घेऊन जाऊन नवीन कपडे ड्रेस व फेटे बांधून सत्कार करण्यात आला या वेगळ्याच सामाजिक बांधलिकी उपक्रमामुळे इंदापूर शिरूर बारामती तालुक्यात हा लग्न सोहळा एक चर्चेचा विषय ठरला आहे.

## परतूर येथील डॉ.आंबेडकर नगरात केले महामानवाला अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**अशोक ठोके जालना जिल्हा प्रतिनिधी :** महामानव,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 69 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आंबेडकरनगर येथे अभिवादन करण्यात आले.सकाळी 10 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पोलीस निरीक्षक सुदाम भागवत व सामाजिक कार्यकर्त्या संजना पाडेवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार,संजना पाडेवार ,गणेश पवार, द.या. काटे, विष्णू मुजमुले, विलास पाडेवार, राजेश पवार,



दीपक मुजुमले,सुधाकर गिरी, दिपक उबाळे,उत्तम घुगे, विक्रम पाडेवार, अजय पाडेवार,करण पाडेवार,अविनाश पाडेवार, भास्कर पाडेवार,भैया नंदेवार,गौतम पाडेवार,लिंबाजी पाडेवार, तातेराव पाडेवार,विठ्ठल बागल,परमेश्वर पौळ, गौतम पाडेवार,तातेराव पाईकराव,यांची उपस्थिती होती.यावेळी सर्वांनी बौद्ध वंदना घेऊन अभिवादन केले.

## महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरूवात

**दैनिक युवक आधार**
**नागपूर / प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सुरूवात झाली असून अनेक मान्यवरांनी सभापती प्रा. राम शिंदे आणि उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना त्यांच्या दालनात भेट देत शुभेच्छा दिल्या.या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्यासह विधानपरिषद आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, मनिषा कायंदे, निरंजन डावखरे, किरण सरनाईक,



तसेच काँग्रेसचे विधानपरिषद आमदार सतेज पाटील आणि अभिजीत वंजारी यांनी सभापती व उपसभापतींशी सौजन्यपूर्ण संवाद साधत हिवाळी अधिवेशनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या भेटींच्या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांचे कार्यकाळ फलदायी व विधायक ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## श्रीवर्धनमध्ये वाढती वाहतूक कोंडी : मुख्य रस्त्यांवर दिवसा उभ्या मालवाहू गाड्यांमुळे नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** श्रीवर्धन शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना काही दुकानदारांकडून आपला माल उतरवण्यासाठी भरदिवसा मुख्य रस्त्यांवर मालवाहू वाहने थांबवली जात असल्याचे प्रकार सर्रास पाहायला मिळत आहेत. आधीच अरुंद रस्ते, वाढती वाहने आणि पर्यटकांची, सहलींची वाढलेली गर्दी यामुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होतो आहे.

मुख्य बाजारपेठ, भुईगाव नाका, बसस्थानक परिसर, तसेच समुद्रकिनारी जाणाऱ्या मार्गावर अनेक वेळा मालवाहू



गाड्या रस्त्यांच्या मध्यभागी उभ्या असल्याने दोन मिनिटांचा प्रवास पंधरा मिनिटांवर जात आहे. सर्वसामान्य वाहनचालक, पादचारी आणि शालेय वाहनांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

नियमांचे उल्लंघन करून दिवसा-दिवसा माल उतरणारे दुकानदार तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागावर नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

वाहतूक पोलीस आणि नगरपालिका प्रशासनाने ठरवून दिलेल्या वेळेतच माल उतरवण्याचे आदेश कडकपणे लागू करावेत, तसेच मुख्य रस्त्यांवर अनधिकृतपणे गाड्या उभ्या करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## रायवाडीच्या मातीतून देशसेवेचा अभिमान; जयदीप राऊळच्या यशाने तरुणांसमोर आदर्श

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/ रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील ,अलिबाग तालुक्यातील रायवाडी–आक्षी या छोट्याशा गावाने आज देशभरात अभिमानाने मान उंचावली आहे. रायवाडीचा सुपुत्र जयदीप राऊळ याने भारतीय लष्कराच्या तांत्रिक सहाय्यपदाचे (Technical Support/ Technical Assistant) प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून गावाचेच नव्हे तर संपूर्ण तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.या ऐतिहासिक यशानिमित्त आक्षी स्तंभ ते रायवाडी अशी भव्य व उत्साहपूर्ण मिरवणूक काढून जयदीप राऊळ याचे जंगी स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, भगवे-तिरंगे झेंडे, फुलांचा वर्षाव आणि देशभक्तीपर घोषणा यामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला होता. "भारत माता की जय", "जय जवान जय किसान" अशा गर्जना करत नागरिकांनी आपल्या सुपुत्राला मानवंदना दिली.गावाचा पहिला जवान — अभिमानाचा इतिहास विशेष बाब म्हणजे जयदीप राऊळ हा रायवाडी गावातील पहिला युवक आहे, ज्याची भारतीय लष्करात निवड होऊन त्याने प्रशिक्षणही यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. साध्या ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या जयदीपने कठोर परिश्रम, शिस्त आणि देशसेवेची जिद्द यांच्या





जोरावर हे शिखर गाठले. त्यामुळे त्याचे आई-वडील, कुटुंबीय, नातेवाईकांसह संपूर्ण गाव भावूक आणि अभिमानाने भरून आले होते.सर्वांचा सहभाग, एकसंघ आनंद या मिरवणुकीत आक्षी-रायवाडी परिसरातील ज्येष्ठ व तरुण मंडळी, ग्रामपंचायत सरपंच-उपसरपंच, सदस्य, कर्मचारी, सर्वपक्षीय नेते, मित्रपरिवार तसेच महिला-बालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गावकऱ्यांच्या उपस्थितीने ही मिरवणूक केवळ स्वागत न राहता देशभक्तीचा उत्सव ठरली.तरुणांसाठी प्रेरणादायी संदेश..जयदीप राऊळचे यश हेआजच्या तरुणांसाठी ठाम संदेश देते"योग्य दिशा, कठोर मेहनत आणि देशप्रेम असेल तर गाव कितीही लहान असो, स्वप्ने मोठीच घडतात."भारतीय लष्कर हे केवळ नोकरीचे साधन नाही, तर शिस्त, सन्मान आणि सर्वोच्च देशसेवा करण्याची संधी आहे, हे जयदीपने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.पालकांसाठी सकारात्मक विचार पालक वर्गासाठीही ही घटना महत्त्वाचा संदेश देणारी आहे. मुलांच्या शिक्षणासोबतच त्यांना देशसेवेचे स्वप्न पाहण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास, योग्य मार्गदर्शन दिल्यास ग्रामीण भागातूनही सक्षम, कर्तबगार आणि राष्ट्रनिष्ठ जवान घडू शकतात, याचे जिवंत उदाहरण जयदीप राऊळ ठरले आहे. देशसेवेचा उज्ज्वल दीप

आज रायवाडी-आक्षी परिसरात पेटलेला हा देशभक्तीचा दीप अनेक तरुणांच्या मनात भारतीय लष्कराची ओढ निर्माण करेल, तर अनेक पालकांच्या मनात अभिमानाचा नवा विश्वास जागवेल, यात शंका नाही. जयदीप राऊळसारख्या जवानांमुळेच देश सुरक्षित आहे.रायवाडीचा अभिमान, रायगडचा गौरव!

## मुंबई | चैत्यभूमी परिसरात स्वेटर वाटप उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**विश्वदीप कांबळे :** चैत्यभूमी, मुंबई येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आलेल्या अनुयायांची मोठी गर्दी झाली असताना सामाजिक उपक्रमांनाही विशेष महत्त्व लाभले. या पार्श्वभूमीवर सिने अभिनेता किरण प्रधान यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनुयायांना स्वेटर वाटप करून माणुसकीचा सुंदर संदेश दिला.

थंडीत त्रस्त असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आणि इतर अनुयायांना स्वतःहून पुढाकार घेत स्वेटर देत त्यांनी मानवसेवेचे अनोखे उदाहरण घातले. उपस्थित नागरिकांनी यावेळी किरण प्रधान यांचे आभार मानले असून त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



चैत्यभूमी येथे दिवसभर भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

शांत, अनुशासित वातावरणात सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले. अशा सेवा उपक्रमांमुळे समाजातील सहकार्याची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## महापरिनिर्वाण दिन साजरा न केल्याने संताप; सरपंच-ग्रामसेवकांवर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील माळेगाव पिंप्री ग्रामपंचायतीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कोणताही कार्यक्रम, अभिवादन वा पुष्पहार अर्पण करण्यात न आल्याने परिसरातील बौद्ध समाजामध्ये संतापाची लाट उसळली आहे. ग्रामपंचायतच्या सरपंच व ग्रामसेवकांनी सदर दिनाचे औचित्य साधून कोणताही सन्मान कार्यक्रम न केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

स्थानिकांचे म्हणणे आहे की,भारताचे संविधान निर्माते,सामाजिक परिवर्तनाचे प्रणेते आणि मानवतावादी विचारांचे प्रतीक असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन फक्त बौद्ध समाजाचा नसून सर्व भारतीयांचा अभिमानाचा दिवस आहे,मात्र ग्रामपंचायतीने हा दिवस दुर्लक्षित केल्याने समाजाच्या भावना तीव्र दुखावल्या आहेत.शासन परिपत्रक असूनही दुर्लक्ष? दि.१४/११/२०२५ रोजी शासनाने काढलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार,प्रत्येक ग्रामपंचायत,

पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील डॉ.बाबासाहेब यांच्या पुतळ्याजवळ कार्यक्रम,स्वच्छता,



रंगरंगोटी,फुलांची सजावट तसेच हार अर्पण करण्याचे आदेश देण्यात आले होते.मात्र या आदेशाचे पालन न करता ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांनी शासन निर्देशांची पायमल्ली केली असून,हा वर्तनभंग असल्याचा आरोप करण्यात आला आहे.समाजाची मागणी : "तत्काळ कायदेशीर कारवाई करावी!"

माळेगाव पिंप्रीतील अंदाजे ७० ते ८० घरांतील बौद्ध नागरिकांनी या प्रकरणाचा निषेध नोंदवून,संबंधित सरपंच आणि ग्रामसेवकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

यावेळी सचिन शिंदे,शिवराम जाधव, सिध्दांत मोरे,गणेश सोनवणे,पंडित यादव, संतोष जाधव,दिलीप निकम,एम.के.बाहले आदींची उपस्थिती होती.हे प्रकरण दाबले जाते का कारवाई होते.या प्रकरणावर प्रशासन काय भूमिका घेतं याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# कौटुंबिक न्यायालयात 'मध्यस्थी जन-जागृती' कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रणिता ठाकूर प्रतिनिधी उरण रायगड**

**बेलापूर, नवी मुंबई :** कौटुंबिक वादांमध्ये ताण, संघर्ष व त्यातून उद्भवणाऱ्या मानसिक-सामाजिक अडचणी लक्षात घेता मध्यस्थीच्या माध्यमातून सौहार्दपूर्ण तोडगा काढण्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे 'मध्यस्थी जन-जागृती' कार्यक्रमाचा यशस्वी आयोजन करण्यात आले.कार्यक्रम दिनांक ०६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश सुभाष काफरे होते. व्यासपीठावर नवी मुंबई कोर्ट बार असोसिएशनचे उपाध्यक्ष संदीप रामकर व सचिव विकास म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन ॲड.शीतल गायकवाड यांनी केले. प्रास्ताविकात प्रशिक्षित मध्यस्थ ॲड.मोहित मोकल यांनी मध्यस्थी प्रक्रिया, तिची कार्यपद्धती, फायदे व कौटुंबिक प्रकरणांतील तिची प्रभावी भूमिका यावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे न्यायाधीश सुभाष काफरे यांच्या संकल्पनेतून सादर झालेली



'मध्यस्थी'वरील लघुनाटिका.या नाटिकेतून पती-पत्नीतील वाद, त्यातून मुलांवर होणारे मानसिक परिणाम तसेच न्यायालयात मध्यस्थीच्या माध्यमातून त्या वादाचा सौहार्दपूर्ण समाधान कसा केला जातो, याचे प्रभावी दर्शन घडवण्यात आले.

शेवटी दाम्पत्य पुन्हा एकत्र येऊन सुखी संसार जगताना दाखविलेला सकारात्मक संदेश प्रेक्षकांच्या मनाला भिडला.या लघुनाटिकेत ॲड.वंदना दळवी, ॲड. शोभा पाटील, ॲड. संध्या सावंत, ॲड. कृष्णा पवार, ॲड. प्रसाद मढवी, ॲड. विशाखा जाधव, ॲड. किरण भोसले, तसेच न्यायालयातील वरिष्ठ लिपिक कांचन किरवे आणि सहायक राज निकम यांनी भूमिका साकारल्या. त्यांच्या योगदानाबद्दल कौटुंबिक न्यायालय व नवी मुंबई कोर्ट बार असोसिएशनच्या वतीने प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रबंधक गणेश हिरवे यांनी केले. कार्यक्रमाला सुकून प्रकल्पाच्या समुपदेशक सोनल बंदबे, तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी, कौटुंबिक न्यायालयातील कर्मचारी, विधीज्ञ वर्ग आणि मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

मध्यस्थीमुळे न्यायालयीन तणाव, वेळ, खर्च आणि मानसिक त्रास कमी होऊन कुटुंबातील नाती सांभाळली जातात—हा महत्त्वपूर्ण संदेश या जनजागृती कार्यक्रमातून प्रभावीपणे पोहोचला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कौटुंबिक न्यायालय बेलापूरचे कर्मचारी व नवी मुंबई कोर्ट बार संघटनेचे पदाधिकारी यांनी विशेष सहकार्य केले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत 'उच्च जाती'चा प्रश्न

**भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांचे मुख्यमंत्रींकडे निवेदन संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून निलंबित करण्याची मागणी**

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड (मोहदरी) :** दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागामार्फत इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेदरम्यान इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांना "उच्च जातिचे नाव काय?" असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे दिलेले पर्याय — ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वैश्य — हे जातीय भेदभाव वाढवणारे, संविधानविरोधी आणि अत्यंत अनुचित असल्याचा आरोप आजाद समाज पार्टी (कां.) व भीम आर्मीच्या प्रतिनिधींनी केला आहे.

या गंभीर प्रकरणावर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबांना निवेदन देण्यात आले. शिक्षणाच्या माध्यमातून समानता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची भावना जोपासली जाणे अपेक्षित असताना अशा प्रकारचा प्रश्न विद्यार्थ्यांवर चुकीचा परिणाम करणारा असून समाजात जातीय दरी निर्माण करणारा आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

सदर प्रश्न प्रश्नपत्रिकेत कोणाच्या जबाबदारीतून समाविष्ट झाला, याची तात्काळ चौकशी करण्यात यावी तसेच प्रश्नपत्रिका तयार व मंजूर करणाऱ्या यवतमाळ जिल्हा प्राथमिक शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करून त्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रश्नपत्रिका तयार करण्याची आणि अंतिम मंजुरीची प्रक्रिया अधिक काटकसरी, पारदर्शक व जबाबदारीची करण्याचे निर्देश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

यावेळी अशोक भालेराव, जिल्हाध्यक्ष, भीम आर्मी यवतमाळ, राजकुमार भगत युवा जिल्हाध्यक्ष, आजाद समाज पार्टी (कां.), राहुल धुळे, वैभव सूर्यवंशी, अश्विन कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सदर प्रकरणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेली चिंता लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक कारवाई करण्याची अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

## लेकीच्या धाडसीने हलवले सरकार ; बंद प डलेले सौर पॅनल अवघ्या ४८ तासात झाले सुरू

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे:** मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत बसवलेल्या सौर कृषीपंपाचे पॅनल नैसर्गिक आपत्तीमुळे अवघ्या तीन दिवसांत कोसळले संबंधित विभागाकडे ई मेलसह तब्बल ५० हून अधिक तक्रारी करूनही दखल घेतली गेली नाही अखेर शेतकऱ्यांच्या लेकीने थेट मुख्यमंत्र्यांकडे धाव घेतली आणि अवघ्या ४८ तासात प्रशासन हलले सौर पॅनल पूर्ववत बसविले अन् शेतात पून्हा पाणी वाहू लागले मानवत तालुक्यातील रामपुरी बु येथील गरीब शेतकरी गंगाधर तुळशीराम नाईक यांनी ७ जून रोजी मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत आपल्या शेतात सौर कृषीपंप बसविले मात्र १० जून रोजी आलेल्या वादळीवाऱ्यासह हा संपूर्ण सौर पॅनल उखडून पडले त्यामुळे शेतातील सिंचन पूर्ण पणे ठप्प झाले पिके कोमेजून जात होती आणि वडील हवालदिल झाले वडिलांनी सतत तक्रारी देवून ही कोणीच मनावर घेत नव्हते शेवटी नाईक यांच्या लेकीने इयत्ता अकरावीत शिक्षण घेत असलेल्या दुर्गा केशव नाईक हिने वेगळाच मार्ग निवडला गिनीज सोहळ्यात थेट मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला तर ५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र राज्यात एक महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप बसवून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्यानिमित्त प्रमाणपत्र वितरण सोहळा या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या उपस्थित होत्या यावेळी यांच कार्यक्रमात थेट दुरध्वनी लिंकद्वारे धाडसी लेकीने धाडस करीत थेट मुख्यमंत्र्यांशी संवाद साधत आपल्या वडिलांच्या शेतातील सौर कृषीपंप पॅनल कोसळल्याची संपूर्ण हकिकत मांडली ही बाब समजताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेला तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले यावेळी दुर्गा हिने सांगितले की मुख्यमंत्र्यांनी दखल घेतली याचे मला एक शेतकऱ्यांची लेक म्हणून अभिमान वाटतो



## आर्यन धुर्वे वाकेश्वर यांच्या आर्यन बजाज कुलर इलेक्ट्रिक दुकानाला आग लागून अंदाजे 17 लाखाचे नुकसान




**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे**

**भंडारा :** तालुक्यातील भंडारा ते पवनी महामार्ग वाकेश्वर रोड फाट्यावर असलेल्या चाळीतील आर्यन धुर्वे राहणार वाकेश्वर यांच्या आर्यन बजाज कुलर इलेक्ट्रिकल दुकानाला दिनांक ७ डिसेंबर २०२५ ला रात्री ८.३० वाजेच्या दरम्यान शॉर्टसर्किट मुळे आग लागून अंदाजे जवळपास १५ लाखाचे नुकसान व काउंटर मध्ये असलेल्या रोख १.५० लाख रुपये जळून व इलेक्ट्रिक सामान संपूर्ण जळून खाक झाले. त्यामुळे त्यांचे एकूण अंदाजे 17 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे.आग नियंत्रित न झाल्यामुळे पवनी वरून १ व भंडारा येथून २ अग्निशामक दलाच्या गाड्या बोलावण्यात आल्या होत्या .त्यामुळे आग नियंत्रणात आली असून संपूर्ण दुकानाची राख रांगोळी झालेली आहे.

## पाटा पांगरा जंगलात पळसाच्या झाडावर ६५ वर्षीय वृद्धाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील पाटा पांगरा गावाजवळच्या घनदाट जंगलात एक अत्यंत खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. सुमारे ६५ वर्षीय वृद्धाचा मृतदेह एका पळसाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

जंगलात बकऱ्या चारणाऱ्या एका स्थानिक व्यक्तीला हा मृतदेह दिसताच त्याने त्वरित पाटा पांगरा येथील गावकऱ्यांना माहिती दिली. गावकरी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तात्काळ पारवा पोलीस स्टेशनला संपर्क साधला. पोलीस अधिकारी त्वरित घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी पंचनामा सुरू केला.

मृतदेहाच्या चेहऱ्यावरील कपडा काढल्यानंतर त्याची ओळख पटली. हा मृतदेह घाटंजी तालुक्यातील शिरोली गावातील रहिवासी त्र्यंबक निकम (वय अंदाजे ६५) यांचा असल्याचे स्पष्ट झाले.

पोलिसांनी तातडीने त्र्यंबक निकम यांच्या कुटुंबीयांना संपर्क साधून बोलावले.

त्यांचा मुलगा, अमोल त्र्यंबक निकम (वय २९), याने मृतदेहाची ओळख पटवली. वडिलांची चप्पल, चष्मा आणि हातातली लाठी या नेहमीच्या वस्तूंच्या आधारे त्याने मृतदेह आपल्या वडिलांचाच असल्याचे निश्चित केले.

त्र्यंबक निकम यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत परिसरात तर्कवितर्क लढवले जात आहेत. सुरुवातीला काही ठिकाणी शेताच्या करंटमुळे त्यांचा अपघात झाल्याची चर्चा होती.

मात्र, मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने ही आत्महत्या आहे की घातपात (हत्या), या दिशेने तपास सुरू आहे.

पारवा पोलीस स्टेशनचे निरीक्षक यांनी मृतदेह बघताच घात की पात तपासण्यासाठी फॉरेन्सिक टीम ला लगेच घटनास्थळी बोलवले आणि घटनास्थळी तळ ठोकून राहिले आणि परिसरातील पूर्ण जंगलाची कसून तपासणी करत आहेत. मृतदेहाचे गूढ उकलण्यासाठी पुढील माहिती पोस्टमार्टम अहवालातून स्पष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

पारवा पोलीस स्टेशन या घटनेचा सखोल तपास करत असून, जोपर्यंत अहवाल येत नाही, तोपर्यंत मृत्यूचे नेमके कारण अस्पष्ट आहे.

## पोलीस जाणीव सेवा संघ (महाराष्ट्र राज्य) मुंबई मुख्य संपर्क अंधेरी पुर्व कार्यालयाचे भव्यदिव्य उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे :** पोलीस जाणीव सेवा संघाचे संस्थापक-अध्यक्ष रविसर फडणीस,मराठी फिल्म निर्माता व दिग्दर्शक गणपत कोठारी आणि जेष्ठ विधिज्ञ महाराष्ट्र अँड गोवा बार कौन्सिल उपाध्यक्ष उदय वारुंजीकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या शुभप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून अंधेरी विभाग सहायक पोलिस आयुक्त गजानन पवार मेघवाडी विभाग सहायक पोलिस आयुक्त संपतराव पाटील साहेब,एम.आय.डी.सी.पोलिस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र वाणी अंधेरी पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक रोहन सुर्वे अंधेरी पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक




प्रमोद मगर पोलीस तपासचे मुख्य संपादक राजू जाधव हे उपस्थित राहून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्याबदल सर्वांचे शतशः आभार मानले.

यावेळी पोलिस जाणीव सेवा संघाचे महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख संजय शेकोकार,मुंबई अध्यक्ष तुषार रजपुत,मुंबई उपाध्यक्ष सदानंद रजपुत,मुंबई चीफ क्राईम फोटोग्राफर दादा देसाई,तसेच पराग रजपुत, प्रशांत शिंदे व संपूर्ण पोलिस जाणीव सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी खुप परिश्रम घेउन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोलाचे योगदान दिले.त्याबद्दल सर्वांचे शतशः आभार मानले तसेच पोलिस जाणीव सेवा संघाच्या माध्यमातून वर्षभरातील अनेक सनासुदीच्या वेळी पोलिस बांधवांसोबत उत्कृष्ट बंदोबस्त केल्याबद्दल ठाणे टिम व खारदांडा टिम यांना उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी ठाणे जिल्हाध्यक्ष अमित जगताप व ठाणे जिल्हा उपविभाग प्रमुख अंजली खाणकरी यांची टिम,खार दांडा शाखाअध्यक्ष हरिश्चंद्र गोसावी, उपअध्यक्ष श्री.रूपेश मयेकर, सल्लागार श्री खिमजि मजेठिया, चिनूभाई, दाभी, साक्षी राजापूरकर व खार दांडा संपुर्ण टिम आणि अनेक मान्यवर हे उद्घाटन सोहळावेळी उपस्थित होते.

यावेळी पोलीस जाणीव सेवा संघ जालना जिल्हा अध्यक्ष किशोर नाटकर,परमेश्वर अपार,पोलिस तपास महाराष्ट्र क्राईम रिपोर्टर हेमंत जैन,सावजी डायनोजी सेंटरचे डॉ. राहुल राज गायकवाड,कानाजुरे,गणेश जाधव,भालचंद्र म्हात्रे,मुस्तफा सिध्दिकी,विश्वनाथ शिंदे,थोर समाजसेवक शांताराम पाटकर,सुनील मिश्रा,जेन्युल तेली,अवधूत नाईक, अक्षय गावडे,प्रशांत डाफळे,कार्तिकी अवसारे,लक्ष्मी बनसोडे,अनु साठे,ज्योती कदम,मल्लमा बोडा, निसार शेख,प्रमोद मोहीते हे सर्व उपस्थित होते.

## पळसखेड येथील शेतकरी धडकले वीज वितरण कार्यालयावर नियमित व बारा तास वीज देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड.रणजितसिह.ठाकूर :** तालुक्यातील पळसखेड व बिबखेड येथील शेतकऱ्यांनी आठ तासा ऐवजी बारा तास व सुरळीत वीज देण्याची मागणी एका निवेदनाद्वारे उपकार्यकारी अभियंता विज वितरण कंपनी यांच्याकडे केली आहे.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले आहे की पळसखेड व बिबखेड शेतशिवाराला करडा फिडर वरून विज जोडणे केलेली आहे परंतु या फिडर वरून आठ तास पूर्णपणे व सुरळीत लाईन मिळत नाही टाईम टेबल वारंवार बदलतो टाईम टेबल दिल्याप्रमाणे कधीच विज चालू किंवा बंद होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना विजेपासून धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच कधी रात्री तर कधी दिवस लाईन असल्यामुळे शेतीला पाणी देणे अडचणीचे झाले आहे काही शेतकऱ्यांची पिके तर सुकण्याच्या मार्गावर आहेत आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे त्यातच विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे अधिकच भर पडली आहे तरी



येथील शेतकऱ्यांना आठ तासाऐवजी 12 तास व नियमित वीजपुरवठा करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन वीज वितरण कंपनीला देण्यात आले आहे सदर अर्जुन पाटील खरात जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड राजू खांबलकर जिल्हा उपाध्यक्ष युवक काँग्रेस हिरामण खरात सखाराम शिंदे राजूभाऊ खरात प्रकाश गरजे दिलीप पाटील किशोर पाटील गणेश खरात प्रशांत खरात श्रीहरी अवताडे शंकर शिंदे यांच्यासह पळसखेडा व बिबखेडा येथील 30 ते 40 शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अनिकेतच्या मृत्यूस कारणीभूत वाहन सापडले

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** निफाड तालुक्यातील थेटाळे - विंचूर रोडवरील त्रिफुली परिसरात २ डिसेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजेच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात उगाव पानेवाडी येथील १७ वर्षीय अनिकेत गोरख पानगव्हाणे याचा जागीच मृत्यू झाला होता. मात्र संबंधित वाहनचालक वाहन घेऊन फरार झाल्याने आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र पोलिस तपासात सदर वाहनाचा शोध लागला असून अज्ञात चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मयत अनिकेतचा भाऊ फिर्यादी चेतन गोरख पानगव्हाणे यांनी दिलेल्या फिर्यादीत, समोरून भरधाव वेगात येणाऱ्या टाटा कंपनीच्या पांढऱ्या - ग्रे रंगाच्या हायवा एम.एच.१२ वाय. क्यू.१८२१ वरील चालकाने दुर्लक्षपूर्वक वाहन चालवत अनिकेत चालवत असलेल्या होंडा शाईन मोटारसायकल एम.एच.१५ डी. एक्स एक्स ३८१६ ला जोरदार धडक दिली. धडकेमुळे अनिकेत खाली पडला असता, हायव्याच्या ड्रायव्हर साइडच्या मागील चाकाखाली त्याचे डोके आल्याने ते चेंगरून जागीच मृत्यू झाला अशी फिर्याद दिली आहे. त्यांचे फिर्यादी वरून आरोपी चालकाच्या विरोधात लासलगाव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१), २८१, १२५(अ)(ब), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४, १७७, १८४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मोहन पाटील पुढील तपास करीत आहेत.

## आता रुग्णवाहिकेतच जीव वाचविण्याची सुविधा; ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्वपूर्ण सुविधा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** माणसाला कधीही काहीही होऊ शकते. त्यावेळी रुग्णालयात पोहचेपर्यंत वाहन नसल्याने रस्त्यातच जीव जातो. त्यामुळे योग्य अशी वाहन सुविधा असावी व वाहनातच अत्याधुनिक सर्व सोयी सुविधा असाव्यात यासाठी बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशन या सामाजिक संस्थेने अत्याधुनिक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे आता शहरी भागातील जनतेसोबाबत ग्रामीण भागात दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या जनतेला ॲम्ब्युलन्स मधेच उपचार होणार आहेत. या उपक्रमाची सुरवात अपोलो रुग्णालयात सुरू झाली असून अपोलो हॉस्पिटल्सचे सीईओ अरूनेश पुनेथा, सुश्री सुधा झिजारिया, आपत्कालीन विभागाचे संचालक डॉ. नितीन जगासिया, म्हणाले, "जेव्हा मदतीसाठी पहिला फोन येतो तेव्हाच आपत्कालीन उपचारांची सुरुवात होते, रुग्णालयात पोहोचल्यावर नव्हे. या रुग्णवाहिका म्हणजे चालते फिरते अतिदक्षता विभाग असून त्या जीवन वाचविण्यासाठी निर्णायक ठरणाऱ्या सुरुवातीच्या काळात तज्ज्ञांद्वारे उपचार देण्याकरिता सज्ज आहेत. वेळ वाचवण्याचे आणि जीवन वाचवण्याचे आमचे ध्येय साध्य करण्यास या ॲम्ब्युलन्स उपयुक्त ठरणार आहेत.

# पालखेडमध्ये भव्य गणित व बाल वैज्ञानिक प्रदर्शनाने शाळा झाली विज्ञान नगरी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल गेल्या दोन दिवसांत अक्षरशः विज्ञानाच्या विश्वात न्हाऊन निघाले होते. शाळेच्या विस्तीर्ण मैदानात उभारलेल्या विविध स्टॉल्समुळे परिसरात एक वेगळीच उत्सुकता आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. गणित, विज्ञान आणि रांगोळी प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपली कल्पकता, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टीकोनाची उत्तुंग झेप दाखवून दिली.

उद्घाटन सोहळा महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे यांच्या हस्ते पार पडला. या वेळी ग्रामपंचायत प्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन पदाधिकारी, शिक्षक-पालक संघाचे सदस्य तसेच गावातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या चेहऱ्यावर विद्यार्थ्यांच्या कौशल्याबद्दल अभिमान आणि कुतूहल स्पष्टपणे जाणवत होते.

**बाल वैज्ञानिकांची जिद्द आणि अभ्यासू वृत्तीची झलक**

इयत्ता ५वी ते १०वीतील 115 विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदवला. शालेय विद्यार्थ्यांकडून अपेक्षित कल्पनाशक्तीचा पलीकडचा प्रयोगात्मक दृष्टिकोन अनेक मॉडेल्समध्ये पाहायला मिळाला.

पाण्याचा धबधबा, जलशुद्धीकरण यंत्र, स्थितीक विद्युत, गवत कापणी यंत्र, ग्रीन हाऊस, होममेड कुलर, उड्डाण घेणारे हवेच्या दाबावर चालणारे रॉकेट, सोलर सायकल, स्मार्ट व्हिलेजचे मॉडेल — प्रत्येक प्रकल्प मागे एक वैज्ञानिक विचार, अभ्यास आणि प्रयोग दडलेला होता.

ज्वालामुखीपासून रेन वॉटर हार्वेस्टिंगपर्यंत, प्रदूषण मापक उपकरणांपासून प्लास्टिक रियुजच्या संकल्पनेपर्यंत — विद्यार्थ्यांनी समाजासाठी उपयुक्त विज्ञान कसे असावे, हे अत्यंत प्रभावीपणे मांडले.

**शाळेचे मैदान म्हणजे जणू विज्ञानाचे जीवंत प्रयोगशाळाच**






सकाळीच मैदानावर विद्यार्थ्यांची धावपळ, स्टॉल्स सजवण्यातील काळजी, पोस्टरची मांडणी, मॉडेल्सची चाचणी… प्रत्येकजण आपला उपक्रम अधिक आकर्षक कसा दिसेल यासाठी झटत होता.

पाहुणे येताच त्यांच्या डोळ्यांत आश्चर्याची झलक दिसत होती—

"इतकी सुंदर मांडणी आणि एवढे नावीन्यपूर्ण प्रयोग? तेही शालेय विद्यार्थ्यांकडून!"

छोट्या गावातील शाळा असूनही या प्रदर्शनाने 'विज्ञान नगरी'चे रूप धारण केले होते. प्रत्येक स्टॉलसमोर पालक, विद्यार्थी आणि नागरिकांची गर्दी उसळली होती. विद्यार्थ्यांचे स्पष्टीकरण, प्रयोग दाखवण्याची शैली आणि वैज्ञानिक संकल्पनांचे सोप्या भाषेत सादरीकरण ही या प्रदर्शनाची मोठी वैशिष्ट्ये होती.

शिक्षकांच्या मार्गदर्शनातून घडले वैज्ञानिक विचारांचे मूळ

या भव्य उपक्रमामागे शिक्षकांची मेहनत व कटाक्षाने दिलेले मार्गदर्शन स्पष्टपणे जाणवत होते.

सुनंदा दुर्दवळे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, राजेंद्र नाठे यांच्यासह शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवत त्यांना प्रयोग, मांडणी व सादरीकरणाची बारकावे शिकवले.

त्यामुळेच प्रत्येक मॉडेलमध्ये एक प्रगल्भता आणि व्यावहारिकता जाणवत होती.

**ज्ञान, विज्ञान आणि सर्जनशीलतेचा संगम**

या प्रदर्शनाने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना विलक्षण वाव मिळाला. उत्सुकता, जिज्ञासा आणि प्रयोगशीलता या विज्ञानाच्या तीन पायांवर उभे राहून विद्यार्थ्यांनी स्वतःचे वैज्ञानिक विश्व घडवले. परिसरातील अनेक विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी गर्दी करून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आयोजकांच्या प्रयत्नांमुळे आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमामुळे हे प्रदर्शन एक संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरले.

# निवडणुकीच्या अनुषंगाने बाळदी येथील गैरजिम्मेदार ग्रामसेवकाची तात्काळ बदली करा

### बाळदी गावातील ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना केली निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड(मोहदरी) :** उमरखेड तालुक्यातील बाळदि ग्रामपंचायतचे ग्रामसेवक हा गेल्या चार - ते पाच वर्षापासून सध्या कार्यभार असल्यामुळे बाळदी सह अजून एका गावाचा कार्यभार असल्यामुळे सदर ग्रामसेवक हा कधीच गावात सातत्यपूर्ण येत नाही.त्यांच्याकडे इतर एका गावाचा कार्यभार असल्यामुळे गावात नियमित न येणे, गावातील नागरिकांच्या कामकाजाला प्राधान्य न देणे, गावातील नागरिकांना अरे रावीची भाषा करणे, तसेच कधी नागरिकांनी समस्या घेऊन कार्यालयात आले असता ग्रामसेवक हा कधीच उपलब्ध



नसतात.त्यामुळे बाळदी गावाचा कार्यभार असलेले ग्रामसेवक डी.बी. सूर्यवंशी यांचा कार्यभार काढून बाळदी गावासाठी इतर ग्रामसेवकाची नेमणूक करून देण्यात यावी. जेणेकरून पुढील आगामी काळात होणाऱ्या निवडणुका या पारदर्शकता व्हाव्या. या करिता सध्याचे जे ग्रामसेवक आहेत त्यांचे गावातील लोकांशी सध्याची जवळीकता व जे संबंध आहेत ते अतिशय सलोख्याचे व जिव्हाळ्याचे निर्माण झाले आहे.या संबंधाचा पुढील होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय नेत्यांशी जवळीक साधून निवडणुकीचा गैरवापर करू शकतो.त्यामुळे राजकीय नेत्यासाठी म्हणून संबंधित अधिकारी यांनी निवडणुका होईपर्यंत तूर्तास हलवा व आमच्या बाळदी गावातील होणारे मतदान हे पारदर्शक व्हावे.याकरिता मा. गटविकास अधिकारी यांनी आमच्यावरील बाबीचा विचार करून सन्माननीय ग्रामसेवक यांची हकालपट्टी करून त्यांचा कार्यभार इतर कोणत्याही ग्रामसेवकावर सोपवावा.

व आम्हाला कर्तव्यदक्ष प्रामाणिक व यांचे आमच्या गावात राजकीय कोणत्याही पक्षाशी संबंध नसलेले किंवा नेत्यांशी हितसंबंध नसलेले असे ग्रामसेवक आम्हाला देऊन आमच्या बाळदी उपकार करावे.यावेळी निवेदन देताना, नितीन राठोड, प्रफुल वानखेडे, प्रवीण इंगळे, रामराव ठाकरे, रामदास पोटे, संदीप हटकर, आदेश बेळतकर, गजानन राठोड, प्रवीण चिरडे, सत्यपाल पोपुलवाड, आदी गावातील मंडळी उपस्थित होते.

# उरण मध्ये मेमोग्राफी व पेप्समियर टेस्ट मोफत शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण, जायंट्स ग्रुप ऑफ उरण व इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे मुंबई ओको केअर सेंटर (एमओसी) कॅन्सर केअर अँड रिसर्च सेंटर पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी मोफत मेमोग्राफी व पॅप्समेयर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते .हे शिबिर बालरोग तज्ञ मोरे हॉस्पिटल आनंद नगर उरण येथे आयोजित केले होते. ३० लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

स्किनिंग मेमोग्राफी ही एक विशिष्ट प्रकारची ब्रेस्ट इमेजिंग आहे जी कमी डोसच्या एक्स-रे चा वापर करून कर्करोग लवकर ओळखते महिलांना लक्षणे दिसण्यापूर्वी जेव्हा तो सर्वात उपचार करण्यायोग्य असतो यावेळी लवकर निदान होऊन पुढील उपचारा करण्याकरता सोपे होते

त्यामुळे महिलांसाठी ही टेस्ट




करणे अतिशय गरजेचे आहे स्तनाच्या कर्करोगाची तपासणी करण्यासाठी दरवर्षी मेमोग्राफी आणि क्लीनिकल ब्रेस्ट तपासणी करणे वयाच्या ६५ नंतर सुद्धा डॉक्टरांचा सल्ला घेऊन या टेस्ट केल्या तर आरोग्याच्या दृष्टीने चांगले आहे.

यावेळी उरण मधील डॉक्टर वेल्फेअर असोसिएशनचे डॉक्टर विकास मोरे (अध्यक्ष) डॉ. कृष्णा बोरकर (सचिव) डॉ प्रदीप अटकरी (खजिनदार) डॉ सत्या ठाकरे, डॉ. मोना बोरकर डॉ. अजय कोळी डॉ. घनश्याम पाटील इंडियन मेडिकल असोसिएशन उलवे आदी मान्यवर डॉक्टरांच्या उपस्थितीत

मेमोग्राफी शिबिर सोहळ्याचे उद्घाटन सुंदरीत्या पार पडले. उरण मधील पोलीस महिला कर्मचारी यांनी या शिबिराची आपली तपासणी करून घेऊन सुरुवात केली.

या कार्यक्रमासाठी संगीता सचिन ढेरे( श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण अध्यक्षा),कविता म्हात्रे, वैशाली पाटील, मीना रावल, अभया म्हात्रे, तृप्ती भोईर सुप्रिया सरफरे, प्रियवंदा तांबटकर मॅडम, देवेंद्र पिंपळे ,रोशनलाल मेहता सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे.

# सेवा सहयोग फाऊंडेशनचा उपक्रम ठरला प्रेरणादायी : नेतृत्व विकास शिबीरात मुलींचा मोठा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा तालुका प्रतिनिधी शिरीष समेळ :** सेवा सहयोग फाऊंडेशन आणि महानगर गॅस लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या किशोरी विकास प्रकल्पा अंतर्गत दोन दिवसीय नेतृत्व विकास शिबीराचा यशस्वी समारोप माणगाव येथे उत्साहात झाला. या शिबिराचे उत्कृष्ट नियोजन व अंमलबजावणी माणगाव विभागाच्या समन्वयक सौ. अश्विनी गणेश समेळ यांनी काटेकोरपणे पूर्ण केली. कोस्ते खुर्द, तळेगाव, भादाव, रेपोली व कालवण या गावांमधील तब्बल १५१ किशोरींनी शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नेतृत्व गुण विकासासाठी विविध सत्रांचे आयोजन शिबिराच्या पहिल्या दिवशी नेतृत्वगुण वृद्धीसाठी बहुआयामी सत्रांचे आयोजन करण्यात आले. एस.एन.डी.टी. महाविद्यालय श्रीवर्धनचे प्राध्यापक डॉ. डी. पी. राणे यांनी मुलींना करिअर मार्गदर्शनाचे प्रेरणादायी सत्र घेतले. शिक्षण, करिअर निवड, कौशल्य विकास अशा विविध विषयांवर राणे सरांनी सोप्या भाषेत



मार्गदर्शन करून मुलींना मोठी दिशा दिली.

यानंतर माणगाव पोलीस ठाण्याच्या दामिनी पथकातील महेश्वरी सावरकर व वर्षा मोरे यांची मुलाखत साची टेंबे हिने घेऊन मुलींना स्वसंरक्षण, सुरक्षितता आणि प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत ध्येय साध्य करण्याबाबत प्रेरक संदेश दिला. कठीण परिस्थितीतही चिकाटीने पुढे जाण्याचे त्यांचे जिवंत उदाहरण मुलींना उर्जा देणारे ठरले.

पालघर विभागाच्या समन्वयक पूनम घरत यांनी गटचर्चेच्या माध्यमातून मुलींना बोलते केले. विविध सामाजिक व वैयक्तिक विषय मुलींना देऊन त्यावरील समस्या व उपाय स्वतः लिहून सादर करण्यास सांगितले. सर्व मुलींनी यात मनापासून सहभाग दर्शवला. जनकल्याण रक्तपेढीचे डॉक्टर अविनाश भोळप यांनी थॅलेसेमिया विषयावर मार्गदर्शन करत मुलींना आरोग्याविषयी जागरूक केले. त्यानंतर गीता गिजे यांच्या नेतृत्वाखाली खेळ व गटाअंतर्गत उपक्रम राबविण्यात आले.

दुसऱ्या दिवशी शिबिराची सुरुवात राज्यगीत "जय जय महाराष्ट्र माझा" या समुह गायनाने झाली. म्हसळा येथील वसंतराव नाईक कला ,वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतुले महाविद्यालयाचे प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. शिरीष समेळ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. त्यांनी 'नेतृत्व' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत आत्मविश्वास वृद्धी, निर्णयक्षमता, संवादकौशल्य आणि समूहामध्ये नेतृत्व कसे करावे याबाबत मुलींना महत्वाची दिशा दिली.स्वदेश फाऊंडेशन चे माणगावचे मॅनेजर भिमराव भालेराव यांनी स्वदेश फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची ओळख करून देत ग्रामीण भागातील समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. यानंतर कलाकौशल्य सत्रात समन्वयक अश्विनी समेळ यांनी "टाकाऊ पासून टिकाऊ" या संकल्पनेतून नारळाच्या करवंटीपासून आकर्षक बाहुल्या तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. मुलींनी मोठ्या उत्साहाने हा उपक्रम पूर्ण करत कौशल्य विकासाचा सुंदर अनुभव घेतला. रतिक्षा वाढवळ व रोशनी गवस्कर यांनी घेतलेल्या व्यायाम सत्रातून मुलींना आरोग्य, तंदुरुस्ती आणि नियमित व्यायामाचे महत्त्व पटवून दिले.शेवटी उत्कृष्ट गट, उत्कृष्ट लीडर आणि उत्कृष्ट शिबिरार्थी अशा विविध श्रेणींतील मुलींना प्रशस्तीपत्रक व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

दोन दिवसांच्या या शिबिरातून मिळालेल्या अनुभवामुळे भविष्यात आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्व विकासात मोठी मदत होईल, अशा मनोगत व्यक्त करून मुलींनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी किशोरी प्रमुख वैभवी भादावकर, मनस्वी कालवणकर, जयश्री जांबरे, प्रणिता आमोणकर, महेश्वरी टेंबे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पर्यावरण संरक्षणासाठी निफाडचा पुढाकार; नायलॉन मांजा विरोधात अभियान तीव्र

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** मकर संक्रांती अवघ्या काही दिवसांवर येत असताना निफाड शहरात पतंगबाजीचा उत्साह वाढू लागला आहे. परंतु त्याचबरोबर नायलॉन मांजामुळे पक्षी, प्राणी आणि नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होत असल्याने निफाड नगरपंचायतीने कडक पावले उचलली आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नायलॉन मांजाच्या वापर, खरेदी व विक्रीवर पूर्ण बंदी लागू असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नगरपंचायतीतर्फे विशेष पथक स्थापन करण्यात आले आहे.

या पथकाद्वारे शहरातील विविध दुकानांवर अचानक तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

मुख्याधिकारी मा. श्री. धीरज भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या मोहिमेत अधिकारी श्री. अनिल गंदमवाड तसेच कर्मचारी शरद काकुळते, दिपाली गिते, सुनील गांगुर्डे, सिद्धार्थ जगताप आणि बिलाल उस्मान पठाण यांनी माकड बाबा चौक व अकोल खास गल्ली परिसरातील पतंग-साहित्य विक्री दुकाने तपासली. तपासणीदरम्यान नायलॉन मांजा आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकारींनी स्पष्ट केले.



नगरपंचायतीने घाऊक व किरकोळ विक्रेते तसेच साठा करणाऱ्या व्यापाऱ्यांना इशारा दिला आहे की, नायलॉन मांजा विक्री अथवा साठा आढळल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे नागरिकांनीही नायलॉन मांजा वापरू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

निफाड नगरपंचायतीने नागरिकांना सहकार्याचे आवाहन करताना सांगितले की, "मकर संक्रांती सणाचा आनंद घ्या, पण जीविताला धोका पोहोचवणारा नायलॉन मांजा वापरू नका.

पर्यावरण व सुरक्षितता जपण्यासाठी प्रत्येकाची सहभागिता आवश्यक आहे

## महात्मा फुले महाविद्यालयाची सुवर्णकन्या ममता चव्हाण अश्वमेध कबड्डी स्पर्धेत ठरली सुवर्णपदकाची मानकरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेली कु. ममता विजयकुमार चव्हाण हिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे आयोजित २७व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात मुंबई विद्यापीठ महिला कबड्डी संघात सहभागी होऊन सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. महाराष्ट्रातील नामांकित विद्यापीठांना मागे टाकत मुंबई विद्यापीठाच्या महिला कबड्डी संघाने हे दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या संघात मागील दोन वर्षांपासून आपल्या अमीट खिलाडूवृत्तीचा ठसा उमटवून ममता चव्हाण हिने मुंबई विद्यापीठाला सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.



ममता चव्हाण हिच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, ममता चव्हाण ही विद्यार्थिनी म्हणजे खऱ्या अर्थाने आमच्या महाविद्यालयाची सुवर्णकन्या आहे. कारण जिमखाना विभागाची प्रतिनिधी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या कबड्डी संघात तिने आपले भक्कम स्थान निर्माण करून सुवर्णपदकाची परंपरा कायम ठेवली आहे. आपल्या कामगिरीत तिने असेच सातत्य ठेवले तर देशाच्या संघातही ती आपले स्थान निश्चित करू शकेल, याची मला खात्री आहे. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी ममता चव्हाण व तिच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

ममताच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कडू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भाड्याच्या घरात सुरू असलेल्या अंगणवाड्यांना हक्काची जागा द्या

### अंगणवाडी सेविका मदतनीसांची नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्याकडे मागणी

### दोन महिन्यात सर्व अंगणवाड्यांचा कायापालट करू नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर : ( प्रतिनिधी) सय्यद ईसा** : माहूर शहरातील एकात्मिक बाल विकास सेवा नागरी प्रकल्प क्रमांक 3 नांदेड अंतर्गत सुरू असलेल्या 15 अंगणवाड्याची अवस्था बिकट झाल्याने अंगणवाडी सेविकांनी माहूर नगरपंचायत चे नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्याकडे निवेदन देऊन भाड्याच्या घरात सुरू असलेल्य अंगणवाड्यांना हक्काची जागा उपलब्ध करून देत सोयी सुविधा पुरवाव्यात अशी मागणी दि 8 रोजी भेट घेऊन केली आहे

माहूर शहरात एकात्मिक बाल विकास सेवा नागरी प्रकल्प तीन अंतर्गत 15 अंगणवाड्यात जवळपास



500 बालक शिक्षण घेत आहेत या सर्व अंगणवाड्या भाड्याच्या घरात असून दोन अंगणवाड्या ग्रामपंचायत काळातील बांधकाम झालेल्या आहेत त्यामुळे त्याही मोडकळीस आलेल्या आहेत त्यामुळे अनेक दिवसापासून अंगणवाडी सेविका वरिष्ठ कार्यालय आणि नगरपंचायत कडे या अंगणवाड्यात शिक्षण घेणाऱ्या मुलांचे भविष्य धोक्यात आल्याने अंगणवाड्यासाठी नवीन जागा नवीन इमारत आणि सेवा सुविधा पुरविण्यात याव्यात अशी मागणी करत आहेत

वरिष्ठ कार्यालयाने या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने त्यांनी नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी आणि मुख्याधिकारी विवेक कांदे यांची भेट घेऊन मागण्या सादर केल्या यावेळी नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांनी कुठल्याही परिस्थितीत दोन महिन्याच्या आत जुन्या अंगणवाड्यांची दुरुस्ती आणि नवीन अंगणवाड्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून प्रकरण निकाली काढू असे आश्वासन यावेळी दिले यावेळी अंगणवाडी सेविका संघटनेच्या अध्यक्ष सत्त्वशीला पंडित वंदना जाधव सुनीता भगत मीना मनवर सुनिता पवार रेणुका पत्की अंजली खडसे सीमा पदमावार शीतल सौंदलकर नबुबाई वानखेडे चित्रा देशपांडे सलमा शेख युसूफ शारदा दूद्दलवार कांता स्वामी सुलोचना कमठेवाड यांचे सह कार्यालय अधीक्षक संदीप गझलवाड लेखापाल विशाल मरेवाड अभियंता रोहित डुकरे विशाल ढोरे स्वाती गुव्हाडे धनंजय कळसकर मझहर शेख विजय शिंदे यांचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## सरसम बु .येथे महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कॅण्डल रॅली काढत केले शांततेत अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**ता.प्रतिनीधी/ माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगर :** तालुक्यातील मौजे सरसम बु. येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, महामानव, भारतरत्न, ज्ञानाचा अथांग महासागर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी सरसम बु.येथील बौद्ध उपासक,उपासिका व समस्त समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी १० वाजता सरसम बु. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याजवळ सर्व समाज बांधव उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार



अर्पण करून त्रिशरण,पंचशील, बुद्ध वंदना म्हणत त्यांना शांततेत अभिवादन करण्यात आले. तसेच रात्री ७ : ३० वाजता गावातील बौद्ध विहारा पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत कॅण्डल रॅली काढत आंबेडकरांना एक अनोखे अभिवादन गावकऱ्यांतर्फे करण्यात आले.

कॅण्डलरॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापाशी येऊन थांबवण्यात आली. तसेच सर्वांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ कॅण्डल लावत त् यांना आदरांजली अर्पण केली.यानंतर बुद्ध वंदना, धम्म वंदना घेत आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.यावेळी बालिका व महिलांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील गीत म्हणत महापरिनिर्वाण दिनानिमित्त आदरांजली वाहिली.या अभिवादन कार्यक्रमाची संकल्पना तथा नियोजन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार,दलित पॅंथर चे तालुका अध्यक्ष विजय नारायण वाठोरे यांनी केले होते. यासह बालाजी कांबळे, अनिल कांबळे यांनी हा अभिवादनाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास बौद्ध उपासक,उपासिका,बाल-बालिका तथा सर्व समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

## उरण भेडखळ येथे कंटेनरच्या धडकेने युवकाचा जागीच झाला मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी / सायली साळुंके :** उरण तालुक्यातील नवघर - खोपटा रस्त्यावर आज, सोमवारी दि. 8 डिसेंबर2025 दुपारी दीडच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात भेंडखळ गावातील अमोल काळूराम ठाकूर (वय 38) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. बामन लॉंरी यार्डजवळ हा अपघात घडला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रस्त्यावर उतरून 'रास्ता रोको' केले.

मिळालेल्या माहितीनुसार, भेंडखळ येथील अमोल काळूराम ठाकूर हा तरुण दुपारी



सुमारे 1:30 वाजता आपल्या मोटारसायकलवरून खोपटा गावाकडे जात होता. नवघर - खोपटा रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनर ट्रेलरने (एमएच 42 बीयू 5072) अमोलच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर कंटेनरने अमोलला काही अंतरावर फरफटत नेले, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला.अनमोल ठाकूर हे भेंडखळ गावचे रहिवासी असूनत्यंच्या पश्चात पत्नी,दोन लहानमुले असा परिवार आहे. याअपघाताची माहिती मिळताच भेंडखळ गावांतील ग्रामस्थांसह परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि कंटेनर ट्रेलरला ताब्यात घेतले. या रस्त्यावर सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत रस्त्यावर ठिय्या मांडून रास्ता रोको आंदोलन सुरु केकेले. या अपघाताची माहिती भेंडखळ गावातील नागरिकांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (शरदपवार गट) प्रदेश उपाध्यक्षा सौ. भावनाताई घाणेकर यांनी तत्काळ पोलिसांना दिली. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# समाजसेवक आजीनाथ गवळी यांच्या स्नेहभेटीला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार प्रतिनिधी** : शिरूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात रुग्णसेवा आणि विविध सामाजिक कार्यातून सतत सक्रिय असलेले सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ भाऊ गवळी यांनी पुणे येथे वास्तव्यास असलेल्या आपल्या मित्रपरिवाराशी संवाद साधण्यासाठी स्नेहभेट दौरा आयोजित केला.या दौऱ्यास पुणेकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामान्य जनतेच्या अडीअडचणी, सुख-दुःखात नेहमी सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपणारे आजीनाथ गवळी हे कार्यासोबत जनसंपर्कही तेवढ्याच जिव्हाळ्याने टिकवून ठेवतात. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी पुणे व परिसरात स्थायिक झालेल्या आपल्या भागातील मित्र, कार्यकर्ते व नागरिकांची भेट घेतली.



या दौऱ्यादरम्यान त्यांनी रांजणगाव, यवत, खामगाव फाटा, हडपसर, कात्रज, डांगे चौक, मोशी, भोसरी, चिंभळी फाटा, चाकण आणि शिक्रापूर या भागांना भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी नागरिक, युवक व मित्रपरिवाराशी संवाद साधत सामाजिक प्रश्न, आरोग्यसेवा, युवकांचे प्रश्न तसेच शिरूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासाबाबत चर्चा झाली.

या स्नेहभेट दौऱ्यामुळे जुन्या नात्यांना नवी ऊर्जा मिळाली असून अनेक सामाजिक उपक्रमांसाठी नव्याने सहकार्याची भावना निर्माण झाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. आजीनाथ गवळी यांच्या कार्याबद्दल पुणेकरांनी समाधान व्यक्त करत पुढील सामाजिक उपक्रमांसाठी पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.यावेळी स्नेहभेट दौऱ्यामधे पीलीस उपअधिक्षक अविनाश पवार,युवाउद्योजक कुंडलीक सोनटक्के,युवाउद्योजक शंकरराव तांबे,बिभिषण कातखडे,श्रीमंतराव येवले,भगवान म.बारगजे,कमलाकर कासुळे,पत्रकार सतिष मुरकुटे,पत्रकार प्रकाश साळवे,पोपट दादा सुरे,दत्ता सावंत,गौतम नहार,खंडु कातखडे,संतोष नहार,दादासाहेब बनकर,गहिनाथ कातखडे,खंडु साळुंके,दस्तगीर सय्यद,गुलशन बनकर,नवनाथ बनकर,नानाभाऊ बनकर,ज्ञानेश्वर काकडे,विठ्ठल डोके,महेश कातखडे, सोमनाथ बनकर,किरण पाटील, संजय कातखडे,गोवर्धन बनकर,सुदाम बनकर,बंडु बनकर,रोहीदास बनकर,सागर विधाते,मधुकर बनकर,विलास रंधवे,आरुण गवळी,डॉ. निखिल साळवे,पांडुरंग बनकर,हानुमान काकडे,गणेश निंबाळकर,रमेश साळुंके,विकास दिवटे,श्रीम.नानुशा सोनवणे,श्रीम.संजीवणी डोंगरे,भिमाबाई कांबळे,राजेंद्र सुरे,भारत तावरे,गोकुळ शिंदे,लक्ष्मण सुरे,खंडु शिंदे,अमोल काकडे,किरण तांबे, अशोक सुरे,विशाल बनकर, स्वप्नील नरसाळे,नवनाथ निबाळकर,रामनाथ बडे,भागवत बारगजे,अवधुत तावरे,ब्रम्हदेव गर्जे,संजय पालवे,जालींदर ठाकर,विकास धनवे आदींची उपस्थिती होती.

## कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज पनवेल येथे सर्जनशीलतेला वक्तृत्वाची उज्ज्वल जोड

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, पनवेल येथे 8 डिसेंबर रोजी डीएलएलई व एन एस एस विभागातर्फे क्रिएटिव्ह रायटिंग स्पर्धा व वकृत्व स्पर्धा उत्साहात पार पडल्या. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणाऱ्या या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपली चमकदार कामगिरी नोंदवली.

कार्यक्रमासाठी सीईओ डॉ. शिवदास कांबळे, प्राचार्य कल्पेश भोईर, तसेच उपप्राचार्या के.डी. शारा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेसाठी दिलेले स्वयंचलित विषय



विद्यार्थीमित्र आणि सामाजिक भान जागवणारे होते. अन्न वाचवा, महिला सक्षमीकरण, सोशल मीडिया, पर्यावरणाचे रक्षण, माझे करिअर, आरोग्य सेवा, भारताचे संविधान, निवडणूक साक्षरता, ज्येष्ठ नागरिकांची काळजी इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार जोमदारपणे व्यक्त केले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. तर प्रा. रुपाली अहिवले, प्रा. शुभांगी जोशी व प्रा. तेजल जाधव यांनी परीक्षक म्हणून परीक्षणाची जबाबदारी पार पाडली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. चंद्रकांत मुकादम,प्रा. गीता कोरके व चेतना मॅडम यांचेही विशेष सहकार्य लाभले. एकंदर कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला नवी दिशा देत ज्ञान, विचार आणि अभिव्यक्तीचा सुंदर संगम घडवून आणला.

## यशस्वी उद्योजक राहुल अंभोरे 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर सिल्लोड :-** सुवर्णभरारी सामाजिक संस्थेच्या वतीने लोणी येथे नुकत्याच संपन्न झालेल्या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात, सुवर्णभरारीचे संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष राहुल अंभोरे यांना 'यशस्वी उद्योजक समाजभूषण' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे आणि उद्योजक म्हणून केलेल्या भरीव कामगिरीचे हे यथोचित कौतुक आहे.

हा बहुमान सोहळ्यात उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या शुभहस्ते अंभोरे यांना प्रदान करण्यात आला. लाडगांव




येथील श्री दत्त दिगंबर पीठाचे पीठाधिश, धर्माचार्य १००८ श्री श्री श्री महामंडलेश्वर दत्तात्रेय दहिवाळ महाराज, विखे पाटील रणरागिणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. धनश्रीताई सुजय विखे पाटील, सुवर्णभरारीच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. सारिकाताई नागरे, प्रदेशाध्यक्ष संदिप मानकर, सी.ए. डॉ. शंकर अदानी, आणि उद्योजक अजय नागरे आदींनी अंभोरे यांना पुरस्कार देऊन गौरविले.

या पुरस्काराबद्दल त्यांचे रवींद्र माळवे, संतोष सोनार, राजेंद्र कुलथे, बालाजी पोतदार, गजानन मानकर, स्वातीताई मुंडलिक, अनिता माळवे, पवनराजे गायकवाड, रामदास शिंदे, अमोल सोनार, प्रदीप मानकर, श्रीनिवास बानकर, राजेंद्र साबळे, श्रीपाद बोकंद, आणि प्रणव नागरे आदींनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राहुल अंभोरे यांनी उद्योजकता आणि समाजकारण या दोन्ही क्षेत्रांत केलेल्या अतुलनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा 'यशस्वी उद्योजक समाजभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

## पिलीव व परिसरात श्री दत्त जयंती उत्सव भक्तिमय वातावरणामध्ये संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):-** माळशिरस तालुक्यातील पिलीव व परिसरात सालाबाद प्रमाणे याही वर्षी भक्तिमय वातावरणात श्री दत्त जयंती चे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी समर्थ मंदिर कांबळे वस्ती ( वचेरी) या ठिकाणी सद्गुरु श्री. श्री. साखर कारखाना श्री. श्रीनगर (राजेवाडी) चेअरमन एन शेषागिरी राव, व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, संचालिका उषाताई मारकड व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये ह. भ. प. देवकुळे महाराज इंदापूर यांचीअतिशय मार्मिक व भावनात्मक आणि धार्मिक पद्धतीने कीर्तन सेवा व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून विविध प्रकारच्या विद्युत रोषणाईने व मंडप टाकून फटाक्याच्या आतषबाजीत व



तोफांच्या सलामीत श्री दत्त जयंती साजरी करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाची पंगत सद्गुरु श्री .श्री. साखर कारखाना श्री. श्रीनगर (राजेवाडी) व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील व परिवाराने केल्याचे त्यामुळे परिवाराने सांगितले. सदर प्रसंगी भाविक भक्तांच्या भविष्यातील निवाऱ्यासाठी केलेल्या आराखड्याच्या फलकाचे उद्घाटन मा .चेअरमन यान शेषागिरीराव तसेच व्हाईट चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील यांचे हस्ते व ह. भ .प. संभाजी महाराज देवकुळे भरणेवाडी, ह. भ. प .राहुल जाधव महाराज यांचे उपस्थितीमध्ये करण्यात आले. त्याचप्रमाणे पिलीव येथे श्रीराम गल्ली दत्त मंदिर, महादेव मंदिरा नजीक दत्त मंदिर, कै. शामराव कांबळे निवास दत्त मंदिर ,,साठेनगर, भैस वस्ती ,कॅनॉल चौकी गलांडे वस्ती ,कदमवस्ती, विठ्ठलवाडी झिंजेवस्ती दत्त मंदिर, रजपूत गल्ली, शिंगोर्णी बचेरी श्रीराम मंदिरा नजीक ( दत्त मंदिर) पाटील, घराशेजारी,सुळेवाडी, झिंजेवस्ती, काळमवाडी, फळवणी, कोळेगाव, तांदुळवाडी,शेंडेचिंच या गावांमध्ये अनेक ठिकाणी व इतरही गावांमध्ये व तालुक्यांमध्ये भक्ती भावाने श्रीदत्त जयंती साजरी करून धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पाडले. या कार्यक्रमामुळे भक्तिमय वातावरण दिसून आले.

# पुणेच्या 'बरड' एकांकिकेने पटकाविला 'राज्यस्तरीय अटल करंडक'

## 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांचा सन्मान

## भव्य-दिव्य आणि सिने-नाट्य सोहळ्याला साजेसा नयनरम्य सोहळा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (हरेश साठे) :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १२ व्या 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' या राज्यातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या स्पर्धेत पुणेच्या रंग पंढरी संस्थेच्या 'बरड' एकांकिकाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत १२ व्या पर्वातील 'अटल करंडक'वर आपले नाव कोरले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच या वर्षी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सव वर्ष असल्याने या महत्वपूर्ण वर्षानिमित्त 'गौरव रंगभूमीचा' पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी नीना कुलकर्णी आणि सुनील बर्वे या दोन रंगकर्मींचा गौरव करण्यात आला.



मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील तसेच रंगभूमीवरील एक अत्यंत मान्यवर, अनुभवी अभिनेत्री म्हणून नीना कुलकर्णी ओळखल्या जातात. नाटक, चित्रपट, दूरदर्शन आणि वेब सिरीज या सर्व माध्यमांत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. तर सुनिल बर्वे हे सुद्धा मराठी रंगभूमी, दूरदर्शन व चित्रपट क्षेत्रातील एक लोकप्रिय कलाकार आहेत. त्यांची साधी-सरळ भूमिका ते विनोदी, गंभीर, भावनिक अशा विविध प्रकारच्या भूमिका सहजतेने साकारतात म्हणून ते प्रेक्षकांमध्ये विशेष प्रिय आहेत. या दोन्ही मान्यवरांना प्रदान करण्यात आलेल्या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ आणि प्रत्येकी ५० हजार रुपये असे होते. पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे पारितोषिक वितरण आणि सन्मान सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला.

नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारापासून रंगमंचापर्यंत संपूर्ण वातावरण एक वेगळीच आणि मनमोहक अनुभूती देणारे होते. प्रवेश करताच भव्य नटराज प्रतिकृतीचे दर्शन मनाला भारावून टाकणारे होते. पुढे एकांकिकांची तपशीलवार माहिती आणि सुबक सजावटीने सजलेली आकर्षक आरास कलाकार, नाट्य रसिक आणि पाहुण्यांचे लक्ष वेधून घेत होती. कलाकार, मान्यवर आणि प्रेक्षकांसाठी लाल कार्पेटची व्यवस्था करून स्वागताचा देखणा सोहळा उभा करण्यात आला होता. या वर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय अटल करंडक बहारदार सोहळ्याने अधिक विशेष ठरला. थोर दानशूर व्यक्तिमत्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक कार्याला नेहमीच पाठबळ राहिले आहे. त्यामुळे यंदाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा कलाकार आणि प्रेक्षकांच्या वतीने आयोजकांमार्फत विशेष सत्कार करण्यात आला.

हा महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण व सन्मान सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळयाला सन्माननीय उपस्थिती म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पनवेल महापालिकेचे उपयुक्त गणेश शेट्ये, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे, दिगदर्शक व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई प्रमुख कार्यवाह अजित भुरे, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, भरत सावले, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक आयोजन कमिटीचे उपाध्यक्ष विलास कोठारी, निर्माता संजय पाटील, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेते सुव्रत जोशी, अभिनेते व दिग्दर्शक प्रमोद शेलार, प्रमोद अत्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, माजी महापौर कविता चौतमोल, युवा मोर्चाचे अध्यक्ष आनंद ढवळे, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा रुचिता लोंढे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, वर्षा नाईक, अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष हिमेश बहिरा, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, कार्यवाह श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, स्मिता गांधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेत एकाहून एक सरस अशा एकांकिका सादर झाल्याने बहुमानाचा अटल करंडक यंदा कोण पटकावणार याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली होती. अखेर या स्पर्धेत सर्वोत्तम ठरलेल्या ' बरड ' एकांकिकाचे नाव जाहीर होऊन त्यांना अटल करंडक विजेता बहुमान मिळाला. या महाअंतिम फेरीचे परीक्षण रंगभूमी, दूरदर्शन आणि चित्रपट क्षेत्रातील अत्यंत मान्यवर कलाकार म्हणून ओळखले जाणारे आणि सशक्त अभिनयशैली, दमदार आवाज आणि भावपूर्ण मुखअभिनय यामुळे प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केलेले ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक तसेच मराठी टीव्ही आणि रंगभूमीवरील अभिनेत्री व दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, मराठी रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करणारे अनुभवी अभिनेते सुनील तावडे यांनी केले. स्पर्धेचा ब्रँड अँबेसिडर आणि स्पर्धेचे स्वतःचे शीर्षक गीत असलेली हि महाराष्ट्रातील एकमेव एकांकिका स्पर्धा असून यंदाच्या स्पर्धेचे ब्रँड अँबेसिडर सुप्रसिद्ध मालिका व सिने अभिनेते सुव्रत जोशी होते.

नाटय चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी "रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा" हे ब्रीदवाक्य घेऊन 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नवोदित कलाकार व नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली असून या स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो, त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली. आणि हा नवोदित कलाकारांसाठी एक हक्काचा व्यासपीठ बनले. या स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेसाठी मुख्य प्रायोजक टीआयपीएल, सहप्रायोजक निल ग्रुप तर मिडिया प्रायोजक सन मराठी आणि टीआरपी मराठी हे सोशल मीडिया प्रायोजक होते. हि स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांच्यासह टीम अटल करंडक आणि सीकेटी कॉलेज आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेला नाट्य संस्था, कलाकार आणि युवा आणि ज्येष्ठ रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. भव्य दिव्य सिने नाट्य सोहळयाला साजेसा असा अद्भुत आणि डोळयाचे पारणे फेडणारा सोहळा रंगला होता. दुपारी तीन वाजल्यापासून रसिक प्रेक्षकांच्या रांगा लागल्या होत्या. सोहळा हाऊस फुल झाल्याने अखेर प्रेक्षक मिळेल त्या जागी बसून तर काहींनी उभे राहून पण शिस्तीने या सोहळयाचा आनंद लुटला. राज्यातील सर्वात मोठी व नावाजलेल्या या स्पर्धेने सर्वांना भारावून टाकले होते. आणखी विशेष म्हणजे, प्रसिद्ध मराठी अभिनेते व दिग्दर्शक पुष्कर श्रोत्री यांनी त्यांच्या खास विनोदी आणि प्रभावी शैलीत बहारदार सूत्रसंचालन करत कार्यक्रमाला अनोखी रंगत आणली.महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि भव्य दिव्या स्पर्धा असल्याचे अधोरेखित करून एकांकिकेची वार्ता सर्वत्र पोहोचली असल्याचे नमूद केले. तसेच, या सोहळयाच्या निमित्ताने हास्यजत्रा फेम अरुण कदम, श्याम राजपूत व चेतना भट तसेच हास्यसम्राट विजेते प्रा. दीपक देशपांडे यांचा विनोदी मनमोहक मनोरंजनात्मक कार्यक्रम रंगतदार झाला. या सर्वांनी आपल्या अप्रतिम विनोदी कलेची उधळण करत उपस्थितांना खळखळून हसवले.

यावेळी सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश ओक, सुप्रसिद्ध दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध अभिनेते सुनील तावडे यांची अभिनेते पुष्कर श्रोत्री व सुव्रत जोशी यांनी परिक्षक मनोगत मुलाखत घेतली. महाअंतिम फेरीत तब्बल २५ एकांकिकाचे परिक्षण करताना आणि त्या बघताना खूप उत्सुकता होती. विषयांचे वैविध्य होते. प्रत्येक जण आपले पोटेन्शल घेऊन स्पर्धेत उतरला होता. एकांकिका सोपे नाही कारण त्यात कला दिसते. हेवा वाटेल असे कलाकार यामध्ये बघायला मिळाले. त्यामुळे आम्हालाही यातून खूप शिकायला मिळाले. आयोजकांमध्ये नम्रता आणि सहकार्याची भावना स्पष्टपणे दिसून आली, असे मत गिरीश ओक यांनी सांगितले. अटल करंडक विषयी खूप ऐकले होते. नवीन पिढीचे लेखन कलाविष्कार पहायला मिळाले. काही कलाकारांनी तर खूप चांगले काम केले असून तरुण पिढीमुळे रंगभूमीला पुढचा आधार मिळाला आहे, असे सुनिल तावडे यांनी म्हंटले. तर प्रतिमा कुलकर्णी यांनी अशा स्पर्धेमुळे आणि संधीमुळे मराठी रंगभूमीला चांगले दिवस येणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून स्पर्धेची वाढती व्याप्ती, कलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग आणि प्रेक्षकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अटल करंडक स्पर्धेने एक तपपूर्ती गाठल्याचा उल्लेख करत त्यांनी पुढील अनेक वर्षेही या स्पर्धेवर सदैव आशिर्वाद राहावा, असे आवाहन केले.ज्येष्ठ रंगकर्मी नीनाताई कुलकर्णी आणि सुनील बर्वे यांनी रंगभूमीसाठी केलेल्या अविरत सेवेला त्यांनी कृतज्ञतापूर्वक स्मरले. त्यांची समृद्ध कारकीर्द आणि निष्ठा ही भावी कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, त्यांचा आशिर्वाद नवोदित कलावंतांना कायम लाभत राहावा, अशी मनोगतपूर्ण अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर यांनी प्रास्ताविक करताना 'अटल करंडक' एकांकिका स्पर्धेच्या आजवरच्या वाटचालीचा विस्तृत आढावा मांडला. तीन दिवसांची ही स्पर्धा जरी अल्पकालीन असली, तरी तिच्या तयारीसाठी तब्बल सहा महिने मेहनत घ्यावी लागते, असे त्यांनी नमूद केले. उत्कृष्ट कलाकार या व्यासपीठातून घडावेत यासाठी ज्येष्ठ आणि दर्जेदार कलाकारांची परीक्षक म्हणून निवड केली जाते, अशी माहितीही त्यांनी दिली. सन २००५ मध्ये 'मल्हार करंडक' ही स्पर्धा जिल्हास्तरावर होत होती. वाढता आवाका आणि वाढती गुणवत्ता लक्षात घेऊन तिला 'राज्यस्तरीय अटल करंडक' या नावाने स्वरूप देण्यात आले आणि आज 'अटल करंडक'चा यंदाचा १२ वा पर्व यशस्वीपणे पार पडला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठबळासह सर्वांच्या सहकार्यामुळे हे पर्व अधिक भव्य झाले, असे त्यांनी सांगितले. मल्हार करंडकपासून आजवर जयवंत वाडकर यांचे मोलाचे योगदान कायम राहिले असल्याचेही त्यांनी विशेष उल्लेखाने नमूद केले. यंदा राज्यभरातील विविध केंद्रांवर झालेल्या प्राथमिक फेरीत १०२ एकांकिकांनी सहभाग घेतला होता. त्यातून निवडलेल्या २५ उत्कृष्ट एकांकिका अंतिम फेरीत स्पर्धा करीत आहेत. या स्पर्धेच्या यशात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सी. के. टी. महाविद्यालय आणि टीम अटल करंडक यांची अखंड मेहनत असल्याचेही त्यांनी सांगितले

**हे ठरले मानकरी**

प्रथम क्रमांक- 'बरड' (रंग पंढरी पुणे) - ०१ लाख रूपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक

द्वितीय क्रमांक- 'सपान' (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई) - ७५ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

तृतीय क्रमांक- 'स्वातंत्र्य सौभाग्य' (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड) - ५० हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्तेजनार्थ बक्षिसे - 'प्रतीक्षायान' (नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्तेजनार्थ बक्षिसे - 'रेशनकार्ड' (अमर हिंद मंडळ दादर) १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

लक्षवेधी एकांकिका- 'हॅशटॅग इनोसंट'- अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर ) ३० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

परिक्षक पसंती एकांकिका - 'किचकवध पुन्हा'- (सीकेटी स्वायत्तम महाविद्यालय, पनवेल) २० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक-**

प्रथम क्रमांक- निलेश गोपनारायण ('हॅशटॅग इनोसंट'- अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर )

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट अभिनेता-**

प्रथम क्रमांक- रघुनाथ बर्वे ('हॅशटॅग इनोसंट'- अलडेल एज्युकेशन ट्रस्ट सन जॉन कॉलेज पालघर )

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री-**

प्रथम क्रमांक- ताईडी (बरड- रंगपंढरी पुणे)

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट लेखक-**

प्रथम क्रमांक- सुनील पोपट डोंगरे (बरड- रंगपंढरी पुणे)

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट नेपथ्य -**

प्रथम क्रमांक- अद्वैत साप्ते -'स्वातंत्र्य सौभाग्य' (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड)

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**- सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना-**

प्रथम क्रमांक- 'सांग रहियो' (रेवन एंटरटेनमेंट पुणे)

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट संगीत-**

प्रथम क्रमांक- रोहित महादेव - 'बरड' (रंग पंढरी पुणे)

०३ हजार रूपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्कृष्ट वेशभूषा (कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ)- गायत्री व नीरजा - 'प्रतीक्षायान' (नाट्य स्पर्श आणि भवन्स महाविद्यालय अंधेरी) ०१ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

अतुल परचुरे सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार - 'सपान' पात्राचे नाव मामा (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई) ०२ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्कृष्ट बालकलाकार - सुभि -'सपान' -पात्राचे नाव सुमी (डॉक्टर ग्रुप बीएमसी हॉस्पिटल मुंबई) ०१ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

२२ वर्षांपूर्वी माझीही सुरुवात अशाच एकांकिका स्पर्धेतून झाली होती. त्या काळात आम्ही एकांकिका सादर करत असताना एवढ्या मोठ्या स्वरूपाच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नव्हत्या. मात्र, काळाच्या प्रवाहात अटल करंडक स्पर्धेचा परीघ मोठ्या प्रमाणात वाढत गेला आणि आज ही स्पर्धा राज्यभर विस्तारली आहे. मराठी रसिकांचे नाट्यकलेवर आणि सिनेमावर असलेले प्रेम नेहमीच कलाकारांना ऊर्जा देत आले आहे. कलाकार आयुष्यभर शिकत राहतो, आणि म्हणूनच नवोदित कलाकारांनीही निष्ठेने व सातत्याने प्रयत्न करत राहणे अत्यंत आवश्यक आहे. 'कलाकारखाना' या माझ्या संस्थेच्या माध्यमातून अनेक नवोदित कलाकारांना संधी मिळत आहे. याच धर्तीवर, या स्पर्धेतूनही इच्छुक आणि गुणी नाट्यकलाकारांना व्यावसायिक नाटकांच्या क्षेत्रात पुढे जाण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

- अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेता सुव्रत जोशी

मराठी मन नेहमीच नाट्यकला आणि राजकारणात रममाण होत आले आहे. सामाजिक आणि शैक्षणिक सेवेच्या दृढ व्रतातून आम्ही श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था स्थापन केली. माझा सामाजिक वारसा अधिक विस्तारपूर्वक पुढे नेण्याचे कार्य आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर ही माझी दोन्ही सुपुत्र अत्यंत निष्ठेने पार पाडत आहेत. आज असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत अटल करंडक स्पर्धा उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाली. हजारो नवोदित कलाकारांना प्रेरणा, ऊर्जा आणि दिशा देण्याचे कार्य या ज्येष्ठ कलाकारांनी पार पाडले आहे, याबद्दल मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. या सर्वांचे सहकार्य, प्रेम आणि आशीर्वाद भविष्यातही असाच लाभत राहील, अशी श्रद्धा व्यक्त करतो. यापुढेही आपले ऋणानुबंध कायम राहतील

- लोकनेते रामशेठ ठाकूर

संपूर्ण देशात मराठी रंगभूमी क्रियाशील आहे. तरुण पिढीची शक्ती रंगभूमीसाठी काम करत आहे. त्यामुळे रंगभूमी कायम ऊर्जावस्थेत राहील. माझा सन्मान केल्याबद्दल आणि अशा उपक्रमाबद्दल ठाकूर कुटुंबीय आणि पनवेलकरांचे मनापासून आभार मानतो.

सन्मानमूर्ती सुनील बर्वे

नाट्यकला कधीही जुनी होत नाही आणि तिला निवृत्ती नाही. वाटचालीत रसिकांनी कायम प्रेम दिले. नाट्यकला हि सामूहिक कला आहे. त्यामुळे माझ्या यशात सर्वांचे योगदान आहे. अशा करंडक मधून नव्या पिढीला चांगले व्यासपीठ मिळाले आहे त्यामुळे मराठी नाटकाचे भविष्य उज्वल आहे. माझा पुरस्काराने सन्मान केल्याबद्दल मी खूप खूप आभारी आहे.

- सन्मानमूर्ती नीना कुलकर्णी

## महाराष्ट्र जीएसटी राजपत्रित अधिकारी संघटना आंदोलनाच्या भूमिकेत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राज्यकर विभाग मांडत असलेल्या विविध मागण्या, प्रलंबित प्रश्न तसेच अधिकाऱ्यांच्या अधिकारांचे अवमूल्यन यामुळे राजपत्रित अधिकारी संघटना आंदोलनाच्या भूमिकेत उतरली आहे. अनेक वेळा लेखी निवेदने, बैठका व चर्चेनंतरही प्रशासनाकडून अपेक्षित निर्णय न मिळाल्याने अखेर ८ डिसेंबर २०२५ पासून आंदोलन सुरू केले आहे.



संघटनेच्या मते अधिकाऱ्यांच्या बसण्याची व्यवस्था, विभागाची अपूर्ण पुनर्रचना, इंटरनेट संदर्भातील अडचणी, तदर्थ पदोन्नती, प्रलंबित नियतकालिक बदल्या व पदोन्नती, रिक्त चतुर्थ श्रेणी पदे, ऑडिट शाखेमधील सर्व अधिकाऱ्यांना अर्धन्यायिक अधिकार, सह आयुक्त यांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, क्लिष्ट कामकाज पद्धती, दिव्यांग अधिकारी यांची बदली मुख्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या या मुद्द्यांवर अनेकदा शासनाचे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, परिणामी अधिकारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. नियोजित आंदोलन, रूपरेषेनुसार प्रारंभिक काळ्या फिती लावून कामकाज त्यानंतर सामूहिक रजा व पुढे ११ डिसेंबर, २०२५ पासून मुंबई मुख्यालयामध्ये अहोरात्र ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. संघटना आंदोलनावरती ठाम असून सर्व मागण्या मान्य झाल्याशिवाय आंदोलन कदापि मागे घेतले जाणार नाही. असे संघटनेचे अध्यक्ष प्रदीप रणपिसे, सरचिटणीस राजेश बदर, खजिनदार सुलभा सणस, सहखजिंदर योगेश मनाळ यांनी सांगितले

## जासई विद्यालयात जागतिक समानता संधी दिवस म्हणजेच दिव्यांग सप्ताह संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर :** श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयांमध्ये गुरूवार दिनांक ४/१२/२०२५ या दिवशी विद्यालयात दिव्यांग सप्ताह अंतर्गत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते,या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम व उपमुख्याध्यापक श्री कुटे सर तसेच पर्यवेक्षिका सौ मुकादम के.स.मॅडम उपस्थित होत्या इयत्ता पाचवी ते दहावी मधील एकूण ७ दिव्यांग विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.सर्वप्रथम विभागप्रमुख सौ वाजेकर एम. एस. मॅडम यांनी उपस्थित विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम, उपमुख्याध्यापक श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ मुकादम के. एस. मॅडम यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. त्यानंतर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले केले व विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे कौतुक केले.यावेळेस शुक्ला हिमांशी व ठाकूर मनस्वी या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत साजरे केले.

